भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७

**(१९८७ चा अधिनियम क्रमांक १४)**

[ रोजी यथाविद्यमान ]

# The Mental Health Act, 1987

**(Act No. 14 of 1987)**

**[ As in force on the ]**

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२०१५

[ **किंमत** : रुपये . ]

# मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७

## कलमांचा क्रम

**कलमे**


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**मानसिक स्वास्थ्य प्राधिकरणे**

३. मानसिक स्वास्थ्य सेवांसाठी केंद्रीय प्राधिकरण.

४. मानसिक स्वास्थ्य सेवांसाठी राज्य प्राधिकरण.

प्रकरण तीन

**मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये**

५. मनोचिकित्सा रुग्णालये व शुश्रूषालये स्थापन करणे किंवा ती चालवणे.

६. लायसन असेल तरच मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करणे किंवा चालविणे.

७. लायसनसाठी अर्ज करणे.

८. लायसन देणे किंवा नाकारणे.

९. लायसनचा कालावधी व लायसनचे नवीकरण.

१०. विहित शर्तींनुसार मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय चालविणे.

११. लायसन रद्द करणे.

१२. अपील.

१३. मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये यांची तपासणी करणे व रुग्णांना भेटणे.

१४. बाह्य रुग्णावर उपचार करणे.

प्रकरण चार

**मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये दाखल करणे व ठेवणे**

भाग-एक

**स्वेच्छेने दाखल होणे**

१५. स्वेच्छा रुग्ण म्हणून दाखल होण्यासाठी सज्ञान व्यक्तीने विनंती करणे.

१६. पाल्याला दाखल करण्यासाठी पालकाने विनंती करणे.

१७. स्वेच्छा रुग्णांना दाखल करून घेणे व त्यांच्या संबंधातील विनियम.

१८. स्वेच्छा रुग्णांना रुग्णालयातून सोडणे.

भाग-दोन

**विशेष परिस्थितीमध्ये दाखल करून घेणे.**

१९. विवक्षित विशेष परिस्थितीमध्ये मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करून घेणे.

भाग-तीन

**स्वीकृति-आदेश**

**क-अर्जावरील स्वीकृति-आदेश**

२०. स्वीकृति-आदेशासाठी अर्ज करणे.

२१. वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना व आशय.

२२. स्वीकृति-आदेशांसाठीच्या अर्जावरील कार्यवाही.

**ख- मनोरुग्ण व्यक्तींना दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यासाठी स्वीकृति-आदेश**

२३. विवक्षित मनोरुग्ण व्यक्तींच्या संबंधात पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

२४. मनोरुग्ण व्यक्तीला हजर करण्याची कार्यवाही.

२५. क्रूर वागणूक दिलेल्या किंवा योग्य ती काळजी न घेतलेल्या व नियंत्रणाखाली न ठेवलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात आदेश.

**ग - विवक्षित मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करणे व ताब्यात ठेवणे यासंबंधातील आणखी तरतुदी**

२६. कसून चौकशी केल्यानंतर आंतररुग्ण म्हणून दाखल करून घेणे.

२७. मनोरुग्ण व्यक्तीस दाखल करून घेणे व ठेवणे.

२८. वैद्यकीय अधिकाऱ्याचा अहवाल प्रलंबित असेपर्यंत अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीस ठेवणे.

२९. मनोरुग्ण व्यक्तीस मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात हलविले जाईपर्यंत ठेवणे.

**घ - ह्या प्रकरणान्वये आदेशाच्या संबंधातील संकीर्ण तरतुदी**

३०. मनोरुग्ण व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणीची मुदत व कार्यपद्धती.

३१. स्वीकृति-आदेशासाठी प्राधिकार असणे.

३२. प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास स्वीकृति-आदेशाची प्रत पाठवणे.

३३. ज्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात स्वीकृति आदेशाद्वारे दाखल करण्याचा निदेश देता येतो त्यास निर्बंध.

३४. आदेशात किंवा दस्तऐवजात सुधारणा करणे.

३५. ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता त्या व्यक्तीऐवजी बदली व्यक्तीची नियुक्ती करण्याचा अधिकार.

३६. विवक्षित कलमान्वये दंडाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणे व कार्ये पार पाडणे यासाठी सक्षम अधिकारी.

प्रकरण पाच

**मनोरुग्ण व्यक्तीची तपासणी करणे, त्यांना सोडून देणे, अनुपस्थित राहण्यासाठी परवानगी देणे आणि दुसऱ्या जागी हलवणे**

भाग एक

**तपासणी**

३७. वीक्षक अधिकाऱ्यांची नियुक्ती.

३८. वीक्षक अधिकाऱ्यांनी दरमहा निरीक्षण करणे.

३९. मनोरुग्ण असणाऱ्या कैद्यांचे निरीक्षण करणे.

भाग दोन

**रुग्णास रुग्णालयातून सोडणे**

४०. रुग्णाला रुग्णालयातून सोडण्याबाबतचा प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याचा आदेश.

४१. मनोरुग्ण व्यक्तींच्या अर्जावरून सोडून देणे.

४२. नातेवाईक किंवा मित्र इत्यादींकडून योग्य काळजी घेण्याबाबतचे वचनपत्र घेऊन मनोरुग्ण व्यक्तीला सोडण्यासाठी आदेश देणे.

४३. अभिरक्षेत ठेवलेल्या व्यक्तीच्या विनंतीवरून तिला सोडणे.

४४. नंतरच्या चौकशीत निकोप मनाच्या आढळून आलेल्या व्यक्तीला सोडणे.

भाग तीन

**अनुपस्थितीची परवानगी**

४५. अनुपस्थितीची परवानगी.

४६. दंडाधिकाऱ्याने अनुपस्थितीची परवानगी देणे.

भाग चार

**स्थानांतरण**

४७. मनोरुग्ण व्यक्तीचे एका मनोचिकित्सा रुग्णालयामधून किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामधून अन्य मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये स्थानांतरण करणे.

४८. विवक्षित प्रकरणांमध्ये दाखल करणे, ठेवणे व पुन्हा पकडणे.

४९. दंडाधिकाऱ्याच्या आदेशावर अपील करणे.

प्रकरण सहा

**मालमत्ता बाळगणाऱ्या, स्वत:ची व्यक्तिश: अभिरक्षा करणाऱ्या व स्वत:च्या मालमत्तेचे व्यवस्थापन करणाऱ्या अभिकथित मनोरूग्ण व्यक्तीची कसून न्यायिक चौकशी करणे.**

५०. कसून न्यायिक चौकशी करण्यासाठी अर्ज करणे.

५१. कसून चौकशी केल्यानंतर जिल्हा न्यायालयाने ज्या मुद्यांवरून निष्कर्ष काढावयाचे आहेत ते मुद्दे.

५२. मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकाची व तिच्या मालमत्तेच्या व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यासाठी तरतूद करणे.

५३. मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकाची नियुक्ती.

५४. मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापकाची नियुक्ती.

५५. जिल्हाधिकाऱ्याने व्यवस्थापकाची नियुक्ती करणे.

५६. मालमत्ता व्यवस्थापकाने बंधपत्र निष्पादित करणे.

५७. पालकाची व व्यवस्थापकाची नियुक्ती आणि पारिश्रमिक.

५८. पालक व व्यवस्थापकाची कर्तव्ये.

५९. व्यवस्थापकाचे अधिकार.

६०. व्यवस्थापकाने वस्तुसूची व वार्षिक लेखे सादर करणे.

६१. जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार अभिहस्तांतरणपत्र निष्पादित करण्याचे व्यवस्थापकाचे अधिकार.

६२. जिल्हा न्यायालयाच्या निदेशानुसार व्यवस्थापकाने संविदेचे पालन करणे.

६३. कामधंद्याची जागा निकालात काढणे.

६४. व्यवस्थापकाला भाडेपट्ट्याची विल्हेवाट लावता येणे.

६५. मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधातील कोणत्याही बाबीसंबंधात आदेश काढण्याचे अधिकार.

६६. वस्तुसूची किंवा लेखा यांच्या अचूकतेसंबंधात आक्षेप घेतल्यास त्यासंबंधातील कार्यवाही.

६७. संपदेमधून मिळालेल्या उत्पन्नाचा सरकारी खजिन्यामध्ये भरणा आणि गुंतवणूक.

६८. हिशेब घेण्यासाठी नातेवाईकाला दावा दाखल करता येणे.

६९. व्यवस्थापक आणि पालक यांना काढून टाकणे.

७०. एखादा सदस्य मनोरुग्ण झाल्यावरून भागीदारी संस्था विसर्जित करणे आणि तिच्या मालमत्तेची विल्हेवाट लावणे.

७१. विवक्षित प्रकरणात व्यवस्थापकाच्या नियुक्तीशिवाय मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाकरिता, मालमत्तेचा उपयोग करण्याचे अधिकार.

७२. विवक्षित प्रकरणात, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालकाचे रोखे, प्रतिभूती किंवा शेअर्स यांचे हस्तांतरण करण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

७३. भारताबाहेर निवास करणाऱ्या मनोरुग्ण व्यक्तीचे रोखे, प्रतिभूती किंवा शेअर्स यांचा हस्तांतरणाचा आदेश देण्याचा अधिकार.

७४. तात्पुरत्या मनोरुग्णतेच्या बाबतीत, मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्याकरिता संपत्तीचा उपयोग करण्याचा अधिकार.

७५. मनोरुग्ण व्यक्तीचा मानसिक आजार बरा झाल्याचे जिल्हा न्यायालयाला आढळून आल्यास, त्या व्यक्तीसंबंधात केलेली कार्यवाही रद्द करणे.

७६. अपिले.

७७. जिल्हा न्यायालयाचे विनियम करण्याचे अधिकार.

प्रकरण सात

**मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये ठेवलेल्या मनोरुग्ण व्यक्तींच्या चरितार्थाचा खर्च भागविण्याबाबतचे दायित्व.**

७८. विवक्षित प्रकरणांमध्ये चरितार्थाचा खर्च शासनाने सोसणे.

७९. मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेमधून किंवा तिचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेल्या व्यक्तीकडून चरितार्थाचा खर्च प्रदान करण्याकरिता जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करणे.

८०. मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेली व्यक्ती अशा दायित्वातून मुक्त नसणे.

प्रकरण आठ

**मनोरुग्ण व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण**

८१. मानवी हक्कांवर अतिक्रमण न करता मनोरुग्णावर उपचार.

प्रकरण नऊ

**शास्ती आणि कार्यपद्धती**

८२. प्रकरण तीनचे उल्लंघन करून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्याबद्दल किंवा ते चालवल्याबद्दल शास्ती.

८३. मनोरुग्ण व्यक्तीला अयोग्य रीतीने दाखल केल्याबद्दल शास्ती.

८४. कलम ६० आणि कलम ६९ चे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती.

८५. इतर अपराधांबद्दल दिल्या जाणाऱ्या शिक्षेकरिता सर्वसाधारण तरतुदी.

८६. कंपन्यांनी केलेले अपराध.

८७. खटल्यांना मंजुरी.

## प्रकरण दहा

**संकीर्ण**

८८. बंधपत्रविषयक तरतूद.

८९. वैद्यकीय अधिकाऱ्याचा अहवाल.

९०. मनोरुग्ण व्यक्तीला शासनाकडून देय असलेले निवृत्तीवेतन, इत्यादी.

९१. काही विवक्षित प्रकरणांमध्ये मनोरुग्ण व्यक्तींना राज्याच्या खर्चाने कायदेविषयक साहाय्य.

९२. सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

९३. विशिष्ट कायद्यांच्या निर्देशांचा अन्वयार्थ लावणे, इत्यादी.

९४. केंद्र सरकारचा आणि राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

९५. केंद्र सरकार किंवा राज्य शासनाकडून करण्यात आलेले नियम विधानमंडळापुढे ठेवणे.

९६. या अधिनियमाचा इतर कायद्यांवर होणारा परिणाम.

९७. अडचण दूर करण्याचा अधिकार.

९८. निरसन आणि व्यावृत्ती.

# मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७

(१९८७ चा अधिनियम क्रमांक १४)

( रोजी यथाविद्यमान)

[२२ मे, १९८७]

**मनोरुग्ण व्यक्तींवर उपचार करणे व त्यांची काळजी घेणे या संबंधातील कायद्यांचे एकत्रीकरण करणे व सुधारणा करणे, त्यांच्या मालमत्तेच्या व व्यवहारांच्या संबंधात योग्य ती तरतूद करणे आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :-

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास ' मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ ' असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो अधिनियम, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी निरनिराळे दिनांक नियत करण्यात येतील आणि राज्यामधील या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधातील कोणत्याही तरतुदीच्या कोणत्याही निर्देशाचा अन्वयार्थ, त्या राज्यात ती तरतूद अंमलात आणण्यासंबंधीच्या निर्देशाप्रमाणेच लावण्यात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रुषालयात दाखल केलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात, " निर्वाहाचा खर्च " याचा अर्थ, राज्य शासनास या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करता येईल अशा बाबींच्या संबंधातील खर्च, असा आहे ;

(ख) " जिल्हा न्यायालय " याचा अर्थ, ज्या कोणत्याही क्षेत्रासाठी नगर दिवाणी न्यायालय असेल त्या क्षेत्रात ते न्यायालय, आणि अन्य कोणत्याही क्षेत्रात मूळ अधिकारितेचे मुख्य दिवाणी न्यायालय, असा आहे, आणि त्यामध्ये राज्य शासनास अधिसूचनेद्वारे या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात कार्यवाही करण्यासाठी सक्षम न्यायालय म्हणून विनिर्दिष्ट करता येईल असे इतर कोणतेही दिवाणी न्यायालय, याचा समावेश असेल ;

(ग) " निरीक्षण अधिकारी " याचा अर्थ, कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यांच्या तपासणीसाठी राज्य शासनाकडून किंवा लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, असा आहे ;

(घ) " लायसन " याचा अर्थ, कलम ८ अन्वये देण्यात आलेले लायसन, असा आहे ;

(ङ) " लायसनधारक " याचा अर्थ, लायसन धारण करणारा, असा आहे ;

(च) " लायसनप्राप्त मनोचिकित्सा रुग्णालय " किंवा " लायसनप्राप्त मनोचिकित्सा शुश्रूषालय " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये लायसनप्राप्त किंवा यथास्थिति, लायसनप्राप्त असल्याचे मानण्यात आलेले, मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय, असा आहे ;

(छ) " लायसन देणारा प्राधिकारी " याचा अर्थ, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी लायसन देणारा प्राधिकारी म्हणून राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल असा अधिकारी किंवा प्राधिकारी, असा आहे ;

(ज) " दंडाधिकारी " याचा अर्थ,

**१९७४ चा २.** (१) महानगर क्षेत्राच्या संबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २, खंड

(ट) च्या अर्थानुसार महानगर दंडाधिकारी ;

(२) इतर कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाअन्वये दंडाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी ज्याला अधिकार प्रदान करता येतील असा मुख्य न्याय दंडाधिकारी, उप विभागीय न्याय दंडाधिकारी किंवा असा अन्य प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, असा आहे ;

(झ) " वैद्यकीय अधिकारी " याचा अर्थ, शासकीय सेवेतील **राजपत्रित** वैद्यकीय अधिकारी असा आहे, आणि त्यामध्ये राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ह्या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वैद्यकीय अधिकारी म्हणून घोषित केलेले वैद्यक व्यवसायी यांचा समावेश होतो ;

(ञ) कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय या संबंधात " प्रभारी वैद्यकीय अधिकारी " याचा अर्थ, त्या रुग्णालयाचा किंवा शुश्रूषालयाचा त्यावेळी प्रभारी असलेला वैद्यकीय अधिकारी, असा आहे ;

(ट) " वैद्यक व्यवसायी " याचा अर्थ, जिने—

(एक) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जिने मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता धारण केली आहे आणि जिचे नाव त्या कलमाच्या खंड (ट) मध्ये, व्याख्या केल्यानुसार, राज्य वैद्यक नोंदवहीत नोंदवण्यात आलेले आहे, अशी व्यक्ती ; **१९५६ चा १०२.**

(दोन) भारतीय वैद्यक मध्यवर्ती परिषद अधिनियम, १९७० याच्या कलम २, पोटकलम (१) च्या खंड (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जिने मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता धारणा केली आहे, आणि जिचे नाव त्या कलमाच्या पोटकलम (१), खंड (ञ) मध्ये व्याख्या केल्यानुसार भारतीय औषध व वैद्यक राज्य नोंदवहीत नोंदवण्यात आलेले आहे, अशी व्यक्ती ; आणि **१९७० चा ४८**

(तीन) केंद्रीय होमिओपॅथी परिषद अधिनियम, १९७३ याच्या कलम २, पोटकलम (१) च्या खंड (छ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जिने मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता धारण केली आहे, आणि जिचे नाव त्या कलमाच्या पोटकलम (१), खंड (झ) मध्ये व्याख्या केल्यानुसार राज्य होमिओपॅथी नोंदवहीत नोंदवण्यात आलेले आहे अशी व्यक्ती ; **१९७३ चा ५९.**

असा आहे ;

(ठ) " मनोरुग्ण व्यक्ती " याचा अर्थ, मानसिक वाढ खुंटल्याच्या कारणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मानसिक विकाराच्या कारणास्तव जिला औषधोपचाराची गरज आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(ड) " मनोरुग्ण कैदी " याचा अर्थ, ज्याला मनोचिकित्सा रुग्णालयात, मनोचिकित्सा शुश्रूषालयात, तुरुंगात किंवा सुरक्षित ताबा राहील अशा इतर ठिकाणी ठेवण्यासाठी किंवा हलविण्यासाठी कलम २७ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले आदेश काढण्यात आलेले आहेत असा मनोरुग्ण कैदी, असा आहे ;

(ढ) " अज्ञान " याचा अर्थ, जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झाली नाहीत अशी व्यक्ती, असा आहे ;

(ण) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रामध्ये** प्रकाशित करण्यात आलेली अधिसूचना, असा आहे ;

(त) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये विहित केलेले, असा आहे ;

(थ) " मनोचिकित्सा रुग्णालय " किंवा " मनोचिकित्सा शुश्रूषालय " याचा अर्थ, शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मनोरुग्ण व्यक्तींच्या उपचारासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी स्थापन केलेले किंवा चालविले जाणारे रुग्णालय किंवा यथास्थिति, शुश्रूषालय, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने अशा मनोरुग्ण व्यक्तींसाठी स्थापन केलेले किंवा चालविलेले स्वास्थ्यलाभगृह याचा समावेश आहे ; परंतु, त्यामध्ये शासनाकडून स्थापन करण्यात आलेले किंवा चालविले जाणारे आणि जेथे मनोचिकित्सा सेवादेखील पुरविण्यात येतात असे कोणतेही सर्वोपचार रुग्णालय किंवा सर्वोपचार शुश्रूषालय यांचा समावेश होत नाही ;

१९५६ चा १०२. (द) “ मनोचिकित्सक ” याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये घटित झालेल्या, भारतीय वैद्यक परिषदेकडून मान्यताप्राप्त असलेल्या मनोचिकित्सा या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा पदविका धारण करणारा वैद्यक व्यवसायी असा आहे, आणि त्यामध्ये, कोणत्याही राज्याच्या संबंधात, वैद्यक अधिकाऱ्याकडे असलेले मनोचिकित्सा शास्त्राचे ज्ञान व अनुभव लक्षात घेता, त्या राज्य शासनाने, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्याला मनोचिकित्सक म्हणून घोषित केलेले आहे अशा कोणत्याही वैद्यक अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ध) “ स्वीकृति-आदेश ” याचा अर्थ, मनोरुग्ण व्यक्तीला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्यासाठी, किंवा ठेवण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींन्वये काढलेला आदेश, असा आहे ;

(न) “ नातेवाईक ” यामध्ये, मनोरुग्ण व्यक्तीशी, रक्ताचे, विवाहाचे किंवा दत्तकाचे नाते असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(प) संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात “ राज्य शासन ” याचा अर्थ, त्याचा प्रशासक असा आहे.

## प्रकरण दोन

## मानसिक स्वास्थ्य प्राधिकरणे

**मानसिक स्वास्थ्य सेवांसाठी केंद्रीय प्राधिकरण.**

**३.** (१) केंद्र सरकार, त्याला योग्य वाटेल अशा नावाने ओळखले जाणारे मानसिक स्वास्थ्य प्राधिकरण स्थापन करील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण केंद्र सरकारचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांच्या अधीन असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण—

(क) केंद्र सरकारच्या अंतर्गत येत असलेल्या मानसिक स्वास्थ्य सेवांच्या आणि ह्या अधिनियमाअन्वये ज्या इतर सर्व बाबी केंद्र सरकारशी किंवा केंद्र सरकारला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याशी किंवा प्राधिकाऱ्याशी संबंधित आहेत त्यांच्या बाबतीतील विनियमन, विकास, निदेशन व समन्वय यांबाबतचे प्रभारी असेल ;

(ख) केंद्र सरकारच्या नियंत्रणाधीन असलेली मनोचिकित्सा रुग्णालये, मनोचिकित्सा शुश्रूषालये आणि अन्य मानसिक स्वास्थ्य अभिकरणे (जेथे मनोरुग्ण व्यक्तींना सांभाळण्यात येईल किंवा ठेवण्यात येईल अशा ठिकाणांसह) यांचे पर्यवेक्षण करील ;

(ग) मानसिक स्वास्थ्याच्या संबंधातील सर्व बाबींवर केंद्र सरकारला सल्ला देईल ;

(घ) मानसिक स्वास्थ्याच्या बाबीसंबंधात केंद्र सरकारला आवश्यक वाटतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**स्पष्टीकरण :—** या कलमाच्या व कलम ४ च्या प्रयोजनांसाठी, “ मानसिक स्वास्थ्य सेवा ” यामध्ये, मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये यांखेरीज मनोरुग्ण व्यक्तींसाठी असलेले सर्वोपचार रुग्णालयांमधील निरीक्षण कक्ष, दिन परिचर्या केंद्र, अंतररुग्ण उपचार, चालती फिरती उपचार सुविधा आणि इतर सुविधा, स्वास्थ्यलाभगृहे व स्वास्थ्य विश्रामगृहे यांचाही समावेश होतो.

**मानसिक स्वास्थ्य सेवांसाठी राज्य प्राधिकरण.**

**४.** (१) राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा नावाने ओळखले जाणारे मानसिक स्वास्थ्य प्राधिकरण स्थापन करील.

(२) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण, राज्य शासनाचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण यांच्या अधीन असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण–

(क) राज्य शासनाच्या अंतर्गत येत असलेल्या मानसिक स्वास्थ्य सेवा आणि ह्या अधिनियमान्वये ज्या इतर सर्व बाबी राज्य शासनाशी किंवा राज्य शासनाला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याशी किंवा प्राधिकाऱ्याशी संबंधित आहेत त्यांचे विनियमन, विकास व समन्वय यांचे प्रभारी असेल ;

(ख) राज्य शासनाच्या नियंत्रणाधीन असलेली मनोचिकित्सा रुग्णालये, मनोचिकित्सा शुश्रूषालये आणि अन्य मानसिक स्वास्थ्य सेवा अभिकरणे (जेथे मनोरुग्ण व्यक्तींना सांभाळण्यात येईल किंवा ठेवण्यात येईल अशा ठिकाणांसह) यांचे पर्यवेक्षण करील ;

(ग) मानसिक स्वास्थ्यासंबंधातील सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देईल ;

(घ) त्याचप्रमाणे मानसिक स्वास्थ्याच्या बाबींसंबंधात राज्य शासनाला आवश्यक वाटतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

## प्रकरण तीन

## मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये

**मनोचिकित्सा रुग्णालये व शुश्रूषालये स्थापन करणे किंवा ती चालवणे.**

**५.** (१) केंद्र सरकारला भारताच्या कोणत्याही भागात किंवा राज्य शासनाला आपल्या अधिकारक्षेत्रात, त्यास योग्य वाटेल अशा ठिकाणी, मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करून घेण्यासाठी, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी मनोचिकित्सा रुग्णालये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालये यांची स्थापना करता येईल किंवा ती चालवता येतील ; आणि खालील व्यक्तींसाठी स्वतंत्रपणे मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये स्थापन करण्यात येतील किंवा चालवण्यात येतील,—

(क) सोळा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्ती ;

(ख) व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणणारे अल्कोहोल किंवा इतर अंमली पदार्थ घेण्याचे व्यसन असलेल्या व्यक्ती ;

(ग) कोणत्याही अपराधामध्ये दोषसिद्ध झालेली व्यक्ती ;

(घ) विहित करण्यात येईल अशा इतर वर्गातील किंवा प्रवर्गातील व्यक्ती.

(२) जेथे केंद्र सरकारकडून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्यात येते किंवा ते चालविले जाते अशा प्रकरणात, अशा रुग्णालयाच्या किंवा शुश्रूषालयाच्या संबंधात राज्य शासनाकडे केलेल्या, या अधिनियमातील कोणत्याही निर्देशाचा अन्वयार्थ, तो निर्देश केंद्र सरकारकडे केला आहे अशा प्रकारे लावण्यात येईल.

**लायसन असेल तरच मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करणे किंवा चालविणे.**

**६.** (१) या अधिनियमाअन्वये मंजूर करण्यात आलेले वैध लायसन असल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीला, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्यानंतर, कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करता येणार नाही किंवा चालविता येणार नाही :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय (उपचार गृह किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असलेले) यास लायसन देण्यात आलेले असेल आणि असे रुग्णालय किंवा शुश्रूषालय चालू करण्यात आले असेल तर, ते चालू ठेवले जाईल आणि या अधिनियमान्वये असे मनोचिकित्सा रुग्णालय किंवा यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालय यास पुढील कालावधीपुरते लायसन देण्यात आले असल्याचे समजण्यात येईल,

(क) अशा प्रारंभापासून तीन महिन्यांच्या कालावधीसाठी, किंवा

(ख) लायसनसाठी कलम ७ अनुसार करण्यात आलेला अर्ज जर खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर प्रलंबित असेल तर असा अर्ज निकालात काढला जाईपर्यंतच्या कालावधीसाठी.

(२) केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्याकडून स्थापन करण्यात आलेल्या किंवा चालवण्यात येत असलेल्या मनोचिकित्सा रुग्णालयास किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयास, पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**लायसनसाठी अर्ज करणे.**

**७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभास, कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्यासाठी किंवा चालविण्यासाठी प्राधिकृत करणारे वैध लायसन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा, कलम ६ च्या पोटकलम (१) याच्या परंतुकातील खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर, असे रुग्णालय किंवा शुश्रूषालय स्थापन करण्याचा किंवा ते पुढे चालू ठेवण्याचा इरादा असेल तर, अशी प्रत्येक व्यक्ती, असे रुग्णालय किंवा शुश्रूषालय स्थापन करण्यासाठी किंवा यथास्थिति, चालू ठेवण्यासाठी नवीन लायसनच्या मंजुरीकरिता लायसन प्राधिकरणाकडे अशा कालावधीच्या समाप्तीपूर्वी किमान एक महिना अगोदर अर्ज करील.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्याचा किंवा चालू ठेवण्याचा इरादा असलेल्या व्यक्तीने जर, अगोदरच वैध लायसन धारण केले नसेल तर, ती व्यक्ती लायसन मिळवण्यासाठी लायसन प्राधिकरणाकडे अर्ज करील.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेला प्रत्येक अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल व त्यासोबत विहित फी दिलेली असेल.

**लायसन देणे किंवा नाकारणे.**

**८.** कलम ७ अन्वये अर्ज प्राप्त झाल्यानंतर, लायसन प्राधिकरण त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील, आणि

(क) मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यांची स्थापना करणे किंवा ती चालू ठेवणे किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी स्थापन करण्यात आलेली अशी कोणतीही रुग्णालये किंवा शुश्रूषालये पुढे सुरू ठेवणे आवश्यक आहे ;

(ख) अर्जदार हा, मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करून घेण्यासाठी, त्याच्यावर उपचार करण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी विहित केलेल्या किमान सुविधा पुरविण्यास सक्षम आहे ;

(ग) मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय हे, मनोचिकित्सक असलेल्या अशा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या प्रभाराखाली आहे,

याबाबत त्याची खात्री पटल्यास ते, अशा अर्जदाराला, ज्यासाठी अर्ज केला होता ते लायसन विहित नमुन्यात देईल आणि अशी खात्री न पटल्यास, लायसन प्राधिकरण ज्यासाठी अर्ज केला आहे, असे लायसन देण्यास, आदेशाद्वारे नकार देईल :

परंतु असे की, लायसन देण्यास नकार देणारा कोणताही आदेश काढण्यापूर्वी लायसन प्राधिकरण अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि लायसन देण्यास नकार देणाऱ्या प्रत्येक आदेशात असा नकार देण्याची कारणे नमूद करण्यात येतील आणि अशी कारणे, अर्जदारास, विहित करण्यात येईल अशा रीतीने कळवण्यात येतील.

**लायसनचा कालावधी व लायसनचे नवीकरण.**

**९.** (१) लायसन हे हस्तांतरणीय किंवा वारसागामी असणार नाही.

(२) लायसनधारक कोणत्याही कारणास्तव असे कार्य पार पाडण्यास असमर्थ ठरला किंवा लायसनधारक मृत्यू पावला तर, लायसनधारक किंवा यथास्थिति, अशा लायसनधारकाचा वैध प्रतिनिधी, ही बाब विहित रीतीने तात्काळ लायसन प्राधिकरणास कळवील आणि,—

(क) असे कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून किंवा लायसनधारक मृत पावल्यास त्याच्या मृत्यूच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीसाठी ; किंवा

(ख) पोटकलम (३) अन्वये लायसनसाठी करण्यात आलेला कोणताही अर्ज, खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी संपल्यानंतर देखील प्रलंबित असेल तर असा अर्ज निकालात काढला जाईपर्यंत ;

पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी संबंधित मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय पुढे सुरू राहील ; आणि त्यास लायसनप्राप्त मनोचिकित्सा रुग्णालय किंवा, यथास्थिति लायसनप्राप्त मनोचिकित्सा शुश्रूषालय असल्याचे समजण्यात येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लायसनधारकाच्या वैध प्रतिनिधीचा, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर, मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय पुढे सुरू ठेवण्याचा इरादा असेल तर, तो असा कालावधी समाप्त होण्याच्या कमीत कमी एक महिना अगोदर, असे रुग्णालय किंवा यथास्थिति, शुश्रूषालय चालू ठेवण्यासाठी नवीन लायसन मंजूर करण्याकरिता लायसन प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील आणि कलम ८ च्या तरतुदी ज्याप्रमाणे कलम ७ अन्वये करण्यात आलेल्या अर्जाच्या संबंधात लागू होतात, त्याचप्रमाणे अशा अर्जास लागू करण्यात येतील.

(४) प्रत्येक लायसन, कलम ११ अन्वये आधीच रद्द केले नसेल तर, ते दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल.

(५) लायसन प्राधिकरणाकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व फीसह त्याबाबतीत केलेल्या अर्जानुसार, लायसनचे वेळोवेळी नवीकरण करता येईल आणि असा प्रत्येक अर्ज लायसनचा वैध कालावधी संपण्याच्या दिनांकापूर्वी किमान एक वर्ष अगोदर करण्यात येईल :

परंतु असे की, लायसन प्राधिकरणाची खालील बार्बीसंबंधात खात्री पटल्याशिवाय लायसनचे नवीकरण नाकारता येणार नाही :—

(एक) लायसनधारक, मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करवून घेण्यासाठी, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी विहित करण्यात आलेल्या किमान सुविधा त्याच्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात पुरवीत नाही ; किंवा

(दोन) लायसनधारकाने मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय याचा प्रभार मनोचिकित्सक असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे सोपविलेला नाही ; किंवा

(तीन) लायसनधारकाने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचा भंग केला आहे.

**विहित शर्तीनुसार मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय चालविणे.**

**१०.** प्रत्येक मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींना अधीन राहून चालविण्यात येईल.

**लायसन रद्द करणे.**

**११.** (१) लायसन प्राधिकरणाला, लायसनधारकावर लादण्यात येईल अशा अन्य कोणत्याही शास्तीस बाध न आणता पुढील बाबीसंबंधात त्याची खात्री पटली तर, लेखी आदेशाद्वारे लायसन रद्द करता येईल,—

(क) लायसनधारकाने या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय चालविलेले नाही ; किंवा

(ख) मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय हे तेथील आंतररुग्णाच्या नैतिक, मानसिक किंवा शारीरिक अवस्थेस हानिकारक ठरेल अशा रीतीने चालविले जात आहे :

परंतु असे की, लायसनधारकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही, आणि अशा प्रत्येक आदेशात लायसन रद्द करण्यासाठीची कारणे नमूद करण्यात येतील आणि लायसनधारकास, विहित करण्यात आलेल्या रीतीने अशी कारणे कळविण्यात येतील.

(२) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या प्रत्येक आदेशामध्ये, मनोचिकित्सा रुग्णालयातील किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयातील आंतररुग्णांना त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात स्थानांतरित करण्याबाबतचा निदेश अंतर्भूत असेल आणि त्या आदेशात, अशा प्रकारे स्थानांतरण होईपर्यंत अशा आंतररुग्णांची काळजी व अभिरक्षा यासंबंधातील तरतुदी (निदेशाद्वारे केलेल्या तरतुदींसह) देखील अंतर्भूत असतील.

(३) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश :—

(क) कलम १२ अन्वये अशा आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले नसल्यास अशा अपिलांसाठी विहित करण्यात आलेला कालावधी समाप्त झाल्यावर तात्काळ ; आणि

(ख) असे अपील दाखल करून ते खारीज करण्यात आलेले असेल तर, अशा खारीज करण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून,

अंमलात येईल.

**अपील.**

**१२.** (१) लायसन देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या किंवा लायसन रद्द करणाऱ्या लायसन प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या प्रत्येक व्यक्तीला, विहित करण्यात येईल अशा पद्धतीनुसार व अशा कालावधीत, राज्य शासनाकडे अपील करता येईल :

परंतु असे की, जर अपीलकर्त्याला अपील वेळेत सादर न करण्यासाठी पुरेसे कारण होते याबाबत राज्य शासनाची खात्री पटली असेल तर, त्याचा विहित कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेले अपील राज्य शासनास विचारात घेता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये प्रत्येक अपील, विहित करण्यात आलेल्या अशा नमुन्यात व अशा फीसह करण्यात येईल.

**१३.** (१) तपासणी अधिकाऱ्याला, कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात कोणत्याही वेळी प्रवेश करून तपासणी करता येईल आणि तपासणीसाठी, याबाबतीत केलेल्या नियमानुसार जे अभिलेख ठेवणे आवश्यक असतील असे कोणतेही अभिलेख सादर करण्यास फर्मावित येईल : **मनोचिकित्सा रुग्णालये व मनोचिकित्सा शुश्रूषालये यांची तपासणी करणे व रुग्णांना भेटणे.**

परंतु असे की, अशा रीतीने तपासणी केलेल्या रुग्णांचा कोणताही वैयक्तिक अभिलेख पोटकलम ३ च्या प्रयोजनांखेरीज अन्य बाबींसाठी गोपनीय ठेवण्यात येईल.

(२) तपासणी अधिकाऱ्याला तेथे उपचार घेणाऱ्या व काळजी घेतली जाणाऱ्या रुग्णांची,

(क) उपचाराबाबत व काळजी घेण्याबाबत अशा रुग्णाने किंवा अशा रुग्णाच्या वतीने करण्यात आलेल्या कोणत्याही तक्रारीची चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा

(ख) कोणत्याही आंतररुग्णास योग्य उपचार मिळत नाहीत व त्याची काळजी घेतली जात नाही असे मानण्यास तपासणी अधिकाऱ्याला पुरसे कारण असेल अशा कोणत्याही प्रकरणी,

खाजगीरीत्या भेट घेता येईल.

(३) मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये कोणत्याही आंतररुग्णावर योग्य उपचार करण्यात येत नाहीत व त्याची काळजी घेतली जात नाही याबाबत तपासणी अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, त्याला ती बाब लायसन प्राधिकरणाला कळविता येईल आणि तद्नंतर, लायसन प्राधिकरणाला मनोचिकित्सा रुग्णालय किंवा यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालय यांच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला किंवा लायसनधारकाला, त्याला योग्य वाटेल असे निदेश देता येतील आणि असा प्रत्येक प्रभारी वैद्यकीय अधिकारी किंवा लायसनधारक अशा निदेशांचे अनुपालन करण्यास बांधील राहील.

**१४.** प्रत्येक मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यांमध्ये आंतररुग्ण म्हणून दाखल करण्याजोगी जिची स्थिती नसेल किंवा जी त्यावेळेपुरती आंतररुग्ण म्हणून उपचार घेऊ शकत नसेल अशा प्रत्येक मनोरुग्ण व्यक्तीच्या उपचारासाठी, विहित करण्यात येतील अशा सुविधांची तरतूद करण्यात येईल. **बाह्य रुग्णावर उपचार करणे.**

## प्रकरण चार

## मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये दाखल करणे व ठेवणे

## भाग-एक

स्वेच्छेने दाखल होणे

**१५.** स्वतःला मनोरुग्ण समजणाऱ्या आणि कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये उपचारासाठी दाखल होऊ इच्छिणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तीला (अज्ञान नसलेल्या) स्वेच्छारुग्ण म्हणून दाखल करून घेण्यासाठी, प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे विनंती करता येईल. **स्वेच्छा रुग्ण म्हणून दाखल होण्यासाठी सज्ञान व्यक्तीने विनंती करणे.**

**१६.** जेव्हा एखाद्या अज्ञान व्यक्तीचे पालक अशा अज्ञान व्यक्तीस मनोरुग्ण समजत असतील आणि अशा अज्ञान व्यक्तीस कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये उपचारासाठी दाखल करू इच्छित असतील अशा पालकास, अशा अज्ञान व्यक्तीला स्वेच्छा रुग्ण म्हणून दाखल करून घेण्यासाठी प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे विनंती करता येईल. **पाल्याला दाखल करण्यासाठी पालकाने विनंती करणे.**

**१७.** (१) कलम १५ किंवा कलम १६ अन्वये विनंती प्राप्त झाल्यानंतर, प्रभारी वैद्यकीय अधिकारी, त्याला योग्य वाटेल अशा पद्धतीने २४ तासांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीत चौकशी करील आणि अर्जदार किंवा यथास्थिति, अज्ञानी व्यक्तीस, मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये आंतररुग्ण म्हणून उपचाराची गरज असल्याबाबत त्याची खात्री पटल्यास, त्याला अशा अर्जदारास किंवा यथास्थिति, अज्ञानी व्यक्तीस स्वेच्छा रुग्ण म्हणून दाखल करून घेता येईल. **स्वेच्छा रुग्णांना दाखल करून घेणे व त्यांच्या संबंधातील विनियम.**

(२) मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये दाखल करून घेतलेला प्रत्येक स्वेच्छा रुग्ण, मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे किंवा लायसनधारकाद्वारे करण्यात आलेल्या अशा विनियमांचे पालन करण्यासाठी बांधील राहील.

**स्वेच्छा रुग्णांना रुग्णालयातून सोडणे.**

**१८.** (१) मनोचिकित्सा रुग्णालयाचा किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी :–

(क) कोणत्याही स्वेच्छा रुग्णाने ; आणि —

(ख) स्वेच्छा रुग्ण अज्ञान असेल तर, अशा अज्ञान स्वेच्छा रुग्णांच्या पालकांनी,

त्याबाबतीत विनंती केल्यावरून, पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून व अशी विनंती करण्यात आल्यानंतर चोवीस तासांच्या आत, मनोचिकित्सा रुग्णालयामधून किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामधून रुग्णास सोडील.

(२) कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्यात आलेला अज्ञान स्वेच्छा रुग्ण सज्ञानदशा प्राप्त करील अशा प्रकरणात उक्त रुग्णालयाचा किंवा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी, शक्य तितक्या लवकर, त्याला, तो सज्ञान झाला असल्याचे सूचित करील आणि अशी सूचना दिल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत, त्याच्याकडून त्याला आंतररुग्ण म्हणून यापुढे ठेवण्याबाबत विनंती करण्यात आली नसल्यास, त्याला रुग्णालयातून किंवा शुश्रूषालयातून सोडण्यात येईल आणि उक्त कालावधी संपण्यापूर्वी त्याने, त्याला आंतररुग्ण म्हणून यापुढे ठेवण्याबाबत प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे विनंती केली नसेल तर, पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, त्याला, उक्त कालावधी संपल्यावर सोडण्यात येईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याची पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये स्वेच्छेने दाखल होणाऱ्या रुग्णाला सोडणे हे अशा स्वेच्छा रुग्णास हितकारक ठरणार नाही अशी खात्री पटल्यास तो, पोटकलम (१) अन्वये त्याच्याकडे विनंती केल्यापासून बहात्तर तासांच्या आत, किंवा पोटकलम २ मध्ये निर्देशिलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी स्वेच्छा रुग्णाने त्या पोटकलमानुसार विनंती केली नसेल तर, असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी बहात्तर तासांच्या आत दोन वैद्यकीय अधिकारी असलेले मंडळ घटित करून अशा स्वेच्छा रुग्णाला आणखी उपचार करण्याची गरज आहे किंवा कसे याबाबत मंडळाचे मत मागवील आणि अशा स्वेच्छारुग्णाला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आणखी उपचार घेण्याची आवश्यकता आहे असे मंडळाचे जर मत असेल तर, वैद्यकीय अधिकारी स्वेच्छा रुग्णाला सोडणार नाही परंतु एकाच वेळी नव्वद दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी त्याच्यावर उपचार चालू ठेवील.

भाग-दोन

## विशेष परिस्थितीमध्ये दाखल करून घेणे.

**विवक्षित विशेष परिस्थितीमध्ये मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करून घेणे.**

**१९.** (१) स्वेच्छा रुग्ण म्हणून दाखल होण्याची आपली इच्छा व्यक्त न करणाऱ्या किंवा तशी इच्छा व्यक्त करण्यास असमर्थ असलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीस, मनोरुग्ण व्यक्तीच्या नातेवाईकाने किंवा मित्राने याबाबतीत केलेल्या अर्जानुसार जर प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याची मनोरुग्ण व्यक्तीच्या हितासाठी तसे करणे आवश्यक आहे याबाबत खात्री पटली तर, मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आंतररुग्ण म्हणून तिला दाखल करण्यात येईल व तिला तेथे ठेवण्यात येईल :

परंतु , असे की, अशा प्रकारे आंतररुग्ण म्हणून दाखल करून घेण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात, या अधिनियमाच्या अन्य तरतुदीस अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी, आंतररुग्ण म्हणून ठेवून घेता येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात असेल आणि त्यासोबत दोन वैद्यक व्यवसायींची दोन वैद्यकीय प्रमाणपत्रे असतील, या दोन वैद्यक व्यवसायींपैकी एक शासकीय सेवेतील असेल. या वैद्यक व्यवसायींनी, अशा मनोरुग्ण व्यक्तीची अशी अवस्था आहे की, त्याला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आंतररुग्ण म्हणून निरीक्षणाधीन व उपचाराधीन ठेवण्यात यावे अशा आशयाची वैद्यकीय प्रमाणपत्रे दिलेली असतील :

परंतु असे की, संबंधित मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला, असे करणे उचित असल्याबाबत त्याची खात्री पटल्यास, अशी प्रमाणपत्रे मागवून घेण्याऐवजी, रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात कार्यरत असलेल्या दोन वैद्यक व्यवसायींकडून मनोरुग्ण व्यक्तींची तपासणी करवून घेता येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीस किंवा त्याच्या नातेवाईकास किंवा मित्रास, त्याला सोडण्याकरिता दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि दंडाधिकाऱ्यास, ज्या व्यक्तीच्या विनंतीवरून त्याला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल केले होते त्या व्यक्तीला नोटीस दिल्यानंतर व त्याला स्वत:ला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तो अर्ज एकतर मान्य करता येईल किंवा खारीज करता येईल.

(४) स्वीकृति-आदेश मंजूर करण्याकरिता मनोरुग्ण व्यक्तीचे प्रकरण ज्या दंडाधिकाऱ्यासमोर मांडण्यात आले असेल, मग ते या कलमान्वये मांडण्यात आलेले असो वा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीअन्वये असो आणि ह्या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींअनुसार असे करणे आवश्यक असल्याबाबत त्या दंडाधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर त्याने वापरण्याजोग्या अधिकारांना, पूर्वोक्त पोटकलमाच्या तरतुदींमुळे बाध येणार नाही.

भाग-तीन

**स्वीकृति-आदेश**

**क-अर्जावरील स्वीकृति-आदेश**

**स्वीकृति-आदेशासाठी अर्ज करणे.**

**२०.** (१) स्वीकृति-आदेशासाठी खालील व्यक्तींमार्फत अर्ज करता येतील :—

(क) मनोचिकित्सा रुग्णालयाचा किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी ; किंवा

(ख) मनोरुग्ण व्यक्तीचा पती, त्याची पत्नी किंवा अन्य कोणताही नातेवाईक.

(२) तात्पुरत्या उपचार आदेशानुसार मनोरुग्ण व्यक्तीवर जेथे उपचार केले जात असतील अशा मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याची जर–

(क) मनोरुग्ण व्यक्तीवर मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा, यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालयात सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी उपचार चालू ठेवणे आवश्यक आहे अशा प्रकारच्या व एवढ्या प्रमाणातील मानसिक विकाराने ती व्यक्ती ग्रस्त आहे ; किंवा

(ख) मनोरुग्ण व्यक्तीच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि तिची वैयक्तिक सुरक्षा किंवा इतरांची सुरक्षितता यांसाठी अशा व्यक्तीला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवणे आवश्यक आहे ;

याबाबत खात्री पटल्यास, त्याला अशा मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या स्वीकृती आदेशान्वये अशा मनोरुग्ण व्यक्तीला ठेवण्यासाठी ते मनोचिकित्सा रुग्णालय किंवा, यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये स्थित असेल अशा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(३) पोटकलम (५) च्या तरतुदींच्या अधीनतेने, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीचा पती किंवा त्याची पत्नी किंवा जेथे पती किंवा पत्नी नसेल किंवा कोणत्याही आजारामुळे किंवा भारतात नसल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे पती किंवा पत्नीला अर्ज करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला असेल तर अशा प्रकरणात, त्या व्यक्तीच्या अन्य नातेवाईकास, उक्त व्यक्ती सर्वसाधारणपणे ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहते त्या दंडाधिकाऱ्याकडे स्वीकृती आदेशान्वये, मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीस ठेवण्यासाठी अर्ज करता येईल.

(४) अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीचा पती किंवा पत्नी हे अर्जदार नसतील तेव्हा पती किंवा पत्नीकडून अर्ज का करण्यात आला नाही याबाबतची कारणे त्या अर्जात अंतर्भूत असतील आणि त्या अर्जात, अर्जदाराचा अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीशी असलेला नातेसंबंध दर्शविलेला असेल आणि अर्ज कोणत्या परिस्थितीत करण्यात आला ती परिस्थिती नमूद केलेली असेल.

(५) (एक) अज्ञान असलेल्या किंवा

(दोन) अर्ज करण्याच्या दिनांकापूर्वीच्या चौदा दिवसाच्या आत अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीला न पाहिलेल्या

कोणत्याही व्यक्तीस, या कलमान्वये अर्ज करता येणार नाही.

(६) पोटकलम (३) अन्वये प्रत्येक अर्ज, विहित नमुन्यात करण्यात येईल आणि विहित पद्धतीने अर्जावर सही करून तो सत्यापित करण्यात येईल. तसेच त्या अर्जात, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीच्या मानसिक स्थितीच्या चौकशीसाठी यापूर्वी अर्ज करण्यात आला होता किंवा कसे हे नमूद करण्यात येईल आणि त्यासोबत दोन वैद्यक व्यवसायींकडील दोन वैद्यकीय प्रमाणपत्रे असतील आणि त्या दोन वैद्यक व्यवसायींपैकी एक जण हा शासकीय सेवेतील असेल.

**वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना व आशय.**

**२१.** कलम २० च्या पोटकलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक वैद्यकीय प्रमाणपत्रात पुढीलप्रमाणे निवेदन अंतर्भूत असेल :—

(क) त्या पोटकलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक वैद्यक व्यवसायीने अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीस स्वतंत्रपणे तपासले आहे आणि आपल्या स्वतःच्या निरीक्षणाच्या आधारे आणि त्याला सांगितलेल्या तपशिलांच्या आधारे आपले मत मांडले आहे; आणि

(ख) अशा प्रत्येक वैद्यक व्यवसायीच्या मते, अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती अशा प्रकारच्या व प्रमाणातील मानसिक विकाराने ग्रस्त आहे की, तिला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवणे आवश्यक आहे आणि त्या व्यक्तीला असे ठेवणे हे त्या व्यक्तीच्या आरोग्यासाठी हितावह असून तिच्या वैयक्तिक सुरक्षिततेसाठी आणि इतरांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

**स्वीकृति-आदेशांसाठीच्या अर्जावरील कार्यवाही.**

**२२.** (१) कलम २० पोटकलम (२) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर दंडाधिकाऱ्याला, पुढील बाबीसंबंधात त्याची खात्री पटल्यास स्वीकृति-आदेश काढता येईल,—

(एक) मनोरुग्ण व्यक्ती, अशा प्रकारच्या व प्रमाणातील मानसिक विकाराने ग्रस्त आहे की, त्याच्या उपचारार्थ तिला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवणे आवश्यक आहे ; किंवा

(दोन) मनोरुग्ण व्यक्तीच्या आरोग्याच्या हितासाठी व त्याची वैयक्तिक सुरक्षा किंवा इतरांची सुरक्षितता यासाठी त्याला अशा प्रकारे ठेवावे लागेल आणि रुग्णाच्या अशा परिस्थितीमध्ये त्याच्यावर तात्पुरत्या उपचाराचा आदेश काढणे पुरेसे असणार नाही आणि स्वीकृति आदेशच काढणे आवश्यक आहे.

(२) कलम २० च्या पोटकलम (३) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, दंडाधिकारी, अर्जामध्ये नमूद करण्यात आलेली निवेदने व वैद्यकीय प्रमाणपत्रात उघड केल्याप्रमाणे मानसिक आजाराबाबतचा साक्षीपुरावा विचारात घेईल.

(३) दंडाधिकाऱ्याला, पुढील कार्यवाही करण्यासाठी पुरेशी कारणे आहेत असे वाटत असेल तर, तो लेखी नमूद करावयाच्या कारणांस्तव तसे करण्याची आवश्यकता नाही किंवा तसे करणे इष्ट नाही असे त्याला वाटत नसल्यास, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीची व्यक्तिशः तपासणी करील.

(४) स्वीकृति-आदेश योग्य रीतीने व ताबडतोब काढण्यात यावेत याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटल्यास, त्याला असा आदेश काढता येईल, आणि जर दंडाधिकाऱ्याची त्याबाबत खात्री पटली नाही तर, त्या अर्जावर आणखी विचारविनिमय करण्यासाठी दिनांक निश्चित करील आणि त्याला अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल.

(५) पोटकलम (४) अन्वये निश्चित केलेल्या दिनांकाबाबतची सूचना, अर्जदारास आणि दंडाधिकाऱ्याच्या मते ज्याला अशी सूचना देणे आवश्यक असेल अशा अन्य व्यक्तीस देण्यात येईल.

(६) दंडाधिकाऱ्याने जर पोटकलम (४) अन्वये अर्जावर आणखी विचारविनिमय करण्यासाठी दिनांक निश्चित केला असेल तर, त्याला, तो अर्ज निकालात काढला जाईपर्यंत, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीची योग्य ती काळजी व अभिरक्षा यासाठी, त्यास योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

(७) पोटकलम (४) अन्वये निश्चित करण्यात आलेल्या दिनांकास, किंवा दंडाधिकाऱ्याने निश्चित केलेल्या अशा पुढच्या दिनांकास तो अर्ज विचारात घेण्याची कार्यवाही खालील व्यक्तींच्या समक्ष, बंद कक्षात सुरू करील :—

(एक) अर्जदार ;

(दोन) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती (दंडाधिकाऱ्याने आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार अन्यथा निदेश दिलेले नसल्यास)

(तीन) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती तिचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जिला नियुक्त करील अशी व्यक्ती ; आणि

(चार) दंडाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी अन्य व्यक्ती,

आणि जिच्या संबंधात अर्ज करण्यात आला आहे अशी अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ही अशा प्रकारे मनोरुग्ण आहे की, त्या व्यक्तीच्या आरोग्यास हितावह म्हणून आणि त्या व्यक्तीची वैयक्तिक सुरक्षा किंवा इतर व्यक्तींचे संरक्षण यासाठी तिला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात उपचारासाठी ठेवणे आवश्यक आहे, याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटल्यास, त्याला त्या प्रयोजनार्थ स्वीकृति आदेश काढता येईल, आणि त्याची तशी खात्री न पटल्यास, तो, अर्ज खारीज करील

आणि अशा कोणत्याही आदेशात अर्जदाराकडून वैयक्तिकरीत्या किंवा मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेमधून दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा चौकशीच्या खर्चाच्या प्रदानाची तरतूद करता येईल.

(८) पोटकलम ७ अन्वये कोणताही अर्ज खारीज करण्यात आल्यास, दंडाधिकारी असा अर्ज खारीज करण्याची कारणे नमूद करून त्या आदेशाची एक प्रत अर्जदाराला देईल.

**ख- मनोरुग्ण व्यक्तींना दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यासाठी स्वीकृति-आदेश**

**विवक्षित मनोरुग्ण व्यक्तींच्या संबंधात पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.**

**२३.** (१) पोलीस ठाण्याच्या प्रत्येक प्रभारी अधिकाऱ्यास,—

(क) त्याच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोकाट भटकत असल्याचे आढळून आलेली कोणतीही व्यक्ती ही, स्वत:ची काळजी न घेण्याइतपत मनोरूग्ण असल्याचे त्याला सकारण वाटत असेल तर, तिला आपल्या संरक्षणात घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल, आणि

(ख) त्याच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील कोणतीही व्यक्ती मानसिक आजाराच्या कारणास्तव धोकादायक असल्याचे त्याला सकारण वाटत असेल तर, तिला आपल्या संरक्षणात घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये संरक्षणात घेण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, असे संरक्षणात घेण्याची कारणे शक्य तितक्या लवकर तिला कळविल्याखेरीज किंवा तिला संरक्षणात घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या मते, अशी व्यक्ती ती कारणे समजून घेण्यास समर्थ नसेल त्याबाबतीत तिचे नातेवाईक किंवा मित्र कोणीही असल्यास, त्यांना अशी कारणे कळविल्याखेरीज, पोलीस तिला अभिरक्षेत घेणार नाहीत.

(३) ह्या कलमान्वये संरक्षणात घेतलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीला, तिला ज्या ठिकाणी संरक्षणात घेण्यात आले तेथून नजीकच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात आणण्यासाठी लागणारा कालावधी वगळून, तिला संरक्षणात घेण्यात आल्यापासून चोवीस तासांच्या कालावधीत, नजीकच्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात येईल आणि दंडाधिकाऱ्याच्या प्राधिकाराखेरीज, उक्त कालावधीपेक्षा अधिक काळ तिला ताब्यात ठेवण्यात येणार नाही.

**मनोरुग्ण व्यक्तीला हजर करण्याची कार्यवाही.**

**२४.** (१) कलम २३ च्या पोटकलम (३) अन्वये एखाद्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात आले असेल, आणि त्याच्या मते, पुढील कार्यवाही करण्यासाठी पुरेशी कारणे असतील तर, दंडाधिकारी,—

(क) त्या व्यक्तीची आकलनशक्ती आजमावण्यासाठी तिची परीक्षा घेईल,

(ख) वैद्यकीय अधिकाऱ्याद्वारे तिची तपासणी करवून घेईल, आणि

(ग) अशा व्यक्तीच्या संबंधात त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी करील.

(२) पोटकलम (१) अन्वये कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, दंडाधिकाऱ्याला,—

(क) अशी व्यक्ती मनोरुग्ण असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल, आणि

(ख) उक्त व्यक्ती मनोरुग्ण आहे आणि तिच्या आरोग्यासाठी व वैयक्तिक सुरक्षेसाठी किंवा इतरांच्या संरक्षणासाठी असा आदेश काढणे आवश्यक आहे याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटल्यास,

तिला मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आंतररुग्ण म्हणून ठेवण्यासाठी प्राधिकृत करणारा स्वीकृति-आदेश काढण्यात येईल :

परंतु असे की, जर मनोरुग्ण व्यक्तीचा कोणताही नातेवाईक किंवा मित्र असल्यास तो, मनोरुग्ण व्यक्तीस एखाद्या विशिष्ट लायसनप्राप्त मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात उपचारासाठी पाठवू इच्छित असेल आणि तो अशा रुग्णालयाला किंवा शुश्रूषालयाला मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाचा खर्च चुकता करण्याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री पटेल असे लेखी अभिवचन देत असेल तर, दंडाधिकारी, अशा रुग्णालयाच्या किंवा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने संमती दिल्यास, त्या रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात मनोरुग्ण व्यक्तीस दाखल करण्यासाठी आणि तेथे तिला ठेवण्यासाठी स्वीकृति-आदेश काढील :

परंतु, आणखी असे की, मनोरुग्ण व्यक्तीच्या एखाद्या नातेवाईकाने किंवा मित्राने, अशा मनोरुग्ण व्यक्तीची उचितरीत्या काळजी घेण्यात येईल आणि तिला, स्वत:ला किंवा अन्य कोणाला कोणतीही क्षती करण्यापासून परावृत्त करण्यात येईल असे वचन देऊन याबाबत दंडाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल एवढ्या रकमेचे, जामीनदारासह किंवा जामीनदाराविना बंधपत्र

करून दिल्यास दंडाधिकाऱ्याला, स्वीकृति-आदेश काढण्याऐवजी तिला तिची काळजी घेण्यासाठी, नातेवाईकाच्या किंवा मित्राच्या हवाली करता येईल.

**क्रूर वागणूक दिलेल्या किंवा योग्य ती काळजी न घेतलेल्या व नियंत्रणाखाली न ठेवलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात आदेश.**

**२५.** (१) आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एखादी व्यक्ती मनोरुग्ण आहे व तिची उचित काळजी घेतली जात नाही व तिला नियंत्रणात ठेवले जात नाही किंवा अशा मनोरुग्ण व्यक्तीचा ताबा असलेल्या कोणत्याही नातेवाईकांकडून किंवा अन्य व्यक्तीकडून तिला वाईट वागणूक दिली जात आहे किंवा तिला दुर्लक्षित केले जात आहे असे सकारण वाटत असलेला पोलीस ठाण्याचा प्रत्येक प्रभारी अधिकारी, मनोरुग्ण व्यक्ती ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहते त्या दंडाधिकाऱ्यास, ही वस्तुस्थिती तात्काळ कळवील.

(२) एखादी व्यक्ती मनोरुग्ण आहे व तिची योग्य ती काळजी घेतली जात नाही व तिला नियंत्रणात ठेवले जात नाही किंवा अशा, मनोरुग्ण व्यक्तीचा ताबा असलेल्या कोणत्याही नातेवाईकाकडून किंवा अन्य व्यक्तीकडून तिला वाईट वागणूक दिली जात आहे किंवा तिला दुर्लक्षित केले जात आहे असे सकारण वाटत असेल अशा कोणत्याही सामान्य व्यक्तीला, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये अशी मनोरुग्ण व्यक्ती राहते त्या दंडाधिकाऱ्यास, ही वस्तुस्थिती कळविता येईल.

(३) दंडाधिकाऱ्याला, पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा अन्य व्यक्तीकडून प्राप्त झालेल्या अहवालावरून किंवा माहितीवरून किंवा अन्यप्रकारे त्याच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक सीमांमधील कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीची योग्य ती काळजी घेतली जात नाही व तिला नियंत्रणात ठेवले जात नाही किंवा अशा मनोरुग्ण व्यक्तीचा ताबा असलेल्या तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडून किंवा अन्य व्यक्तीकडून तिला वाईट वागणूक दिली जात आहे किंवा तिला दुर्लक्षित केले जात आहे असे आढळून आले तर, त्या दंडाधिकाऱ्यास, त्या मनोरुग्ण व्यक्तीला त्याच्यासमोर हजर करण्यास भाग पाडता येईल. अशा मनोरुग्ण व्यक्तीचा ताबा ज्याच्याकडे आहे अशा किंवा तो ज्याच्याकडे असला पाहिजे अशा नातेवाईकावर किंवा अन्य व्यक्तीवर समन्स बजावता येईल.

(४) जर असा नातेवाईक किंवा अन्य व्यक्ती ही, मनोरुग्ण व्यक्तीची देखभाल करण्यासाठी कायद्याने बांधील असेल तर, दंडाधिकाऱ्यास, अशा मनोरुग्ण व्यक्तीची योग्य ती देखभाल करण्यास आदेशाद्वारे, नातेवाईकाला किंवा अन्य व्यक्तीला फर्मावता येईल आणि असा नातेवाईक किंवा अन्य व्यक्ती उक्त आदेशाचे अनुपालन करण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असेल तर, ती दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(५) मनोरुग्ण व्यक्तीची देखभाल करण्यासाठी कायद्याने बांधील असलेली अशी कोणतीही व्यक्ती नसेल तर, किंवा मनोरुग्ण व्यक्तीची देखभाल करण्यासाठी कायद्याने बांधील असलेली व्यक्ती, अशा व्यक्तीची देखभाल करण्यास नकार देत आहे किंवा तिच्याकडे दुर्लक्ष करीत आहे म्हणून किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे, दंडाधिकाऱ्याला असे करणे योग्य वाटत असेल तर, त्याला मनोरुग्ण व्यक्तीस आपल्यासमोर हजर करण्यास भाग पाडता येईल आणि पोटकलम (४) अन्वये करण्यात येणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीस बाध न येऊ देता अशा व्यक्तीला त्याच्यासमोर जणू काही कलम २३ च्या पोटकलम (३) अन्वये हजर करण्यात आले होते असे मानून कलम २४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने कार्यवाही करता येईल.

### ग - विवक्षित मनोरुग्ण व्यक्तींना दाखल करणे व ताब्यात ठेवणे यासंबंधातील आणखी तरतुदी

**कसून चौकशी केल्यानंतर आंतररुग्ण म्हणून दाखल करून घेणे.**

**२६.** मनोरुग्ण असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात प्रकरण सहा अन्वये कसून चौकशी करताना, कोणतेही जिल्हा न्यायालय, अशा व्यक्तीच्या हितार्थ असे करणे आवश्यक आहे या अभिप्रायाप्रत आले तर, त्या न्यायालयाला अशा व्यक्तीस मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्यात यावे आणि त्यादृष्टीने आंतररुग्ण म्हणून ठेवून घेण्यात यावे असा निदेश आदेशाद्वारे देता येईल आणि जिल्हा न्यायालयास अशा प्रत्येक आदेशामध्ये वेळोवेळी बदल करता येतील किंवा तो रद्द करता येईल.

**मनोरुग्ण व्यक्तीस दाखल करून घेणे व ठेवणे.**

**२७.** कैदी अधिनियम, १९०० याच्या कलम ३० अन्वये किंवा वायुसेना अधिनियम, १९५० याच्या कलम १४४ अन्वये **१९०० चा ३.**
किंवा सेना अधिनियम, १९५० याच्या कलम १४५ अन्वये किंवा नौसेना अधिनियम, १९५७ याच्या कलम १४३ किंवा **१९५० चा ४५. १९५० चा ४६.**
कलम १४४ अन्वये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ३३० किंवा कलम ३३५ अन्वये कोणत्याही मनोचिकित्सा **१९५७ चा ६२.**
रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये मनोरुग्ण कैद्याचा स्वीकार करण्याचा निदेश देणाऱ्या आदेशामध्ये अशा **१९७४ चा २.**
व्यक्तीला अशा रुग्णालयात किंवा यथास्थिति, अशा शुश्रूषालयात किंवा जेथे अशा व्यक्तीस अभिरक्षेत ठेवण्यासाठी जेथे तिचे कायदेशीर स्थानांतरण करता येईल अशा अन्य मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात अशा व्यक्तीला दाखल करून घेण्यासाठी पुरेसा प्राधिकार असेल.

**वैद्यकीय अधिकाऱ्याचा अहवाल प्रलंबित असेपर्यंत अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीस ठेवणे.**

**२८.** (१) जेव्हा एखाद्या अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीस कलम २३ किंवा कलम २५ अन्वये दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात किंवा आणण्यात येईल तेव्हा, दंडाधिकाऱ्यास, लेखी आदेशाद्वारे, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीला सर्वोपचार रुग्णालय किंवा सर्वोपचार शुश्रूषालय किंवा मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामधील अधीक्षण कक्षात किंवा अन्य सोईस्कर ठिकाणी योग्य त्या वैद्यकीय अभिरक्षेखाली ठेवून घेण्यासाठी, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात वैद्यकीय प्रमाणपत्र हे कलम २४ च्या पोटकलम (२) खंड (क) अन्वये योग्यरीत्या देता येईल किंवा कसे याची खातरजमा करणे कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याला शक्य व्हावे याकरिता, दंडाधिकाऱ्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे दहा दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या अशा कालावधीसाठी, अभिरक्षेत ठेवण्यासाठी प्राधिकृत करता येईल.

(२) दंडाधिकाऱ्यास, पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी, वेळोवेळी, लेखी आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीला एका वेळी दहा दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी, अशा प्रकारे आणखी स्थानबद्ध करण्यासाठी प्राधिकृत करता येईल :

परंतु असे की, या पोटकलमांन्वये कोणत्याही व्यक्तीला एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक होणाऱ्या सलग कालावधीसाठी अभिरक्षेत ठेवण्याचा प्राधिकार कोणत्याही व्यक्तीला देण्यात येणार नाही.

**मनोरुग्ण व्यक्तीस मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात हलविले जाईपर्यंत ठेवणे.**

**२९.** जेव्हा जेव्हा दंडाधिकाऱ्याकडून कलम २२, कलम २४ किंवा कलम २५ अन्वये कोणताही स्वीकृति आदेश काढला जातो त्यावेळी, त्यास, कारणे लेखी नमूद करून, ज्या मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात आदेश काढण्यात आला आहे अशा व्यक्तीस मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात हलविले जाईपर्यंत त्या व्यक्तीस दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी तीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी अभिरक्षेत ठेवण्यात यावे असा निदेश देता येईल.

### घ - ह्या प्रकरणान्वये आदेशाच्या संबंधातील संकीर्ण तरतुदी.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणीची मुदत व कार्यपद्धती.**

**३०.** जेव्हा या प्रकरणान्वये कोणताही आदेश, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे काढणे आवश्यक असते त्यावेळी वैद्यकीय प्रमाणपत्रावर ज्याने स्वाक्षरी केलेली आहे त्या व्यक्तीने किंवा असा आदेश दोन वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या आधारे काढणे आवश्यक असते त्यावेळी संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वाक्षरीकर्त्यांनी,

(एक) ज्या दिनांकास असा अर्ज करण्यात आलेला आहे त्या दिनांकाच्या लगतपूर्वी दहा पूर्ण दिवसांच्या अगोदर नसलेल्या कालावधीत अर्जावर आदेश काढण्यात आलेला आहे त्या बाबतीत ; आणि

(दोन) अशा आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी दहा पूर्ण दिवसांच्या अगोदर नसलेल्या कालावधीत कोणत्याही अन्य प्रकरणांमध्ये ;

त्याने, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीला व्यक्तिशः तपासले आहे असे प्रमाणित केल्याखेरीज असा आदेश काढण्यात येणार नाही :

परंतु असे की, जेव्हा दोन वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या आधारे स्वीकृति-आदेश काढणे आवश्यक असते तेव्हा प्रत्येक प्रमाणपत्राच्या स्वाक्षरीकर्त्याने दुसऱ्या प्रमाणपत्राच्या स्वाक्षरीकर्त्याव्यतिरिक्त अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीची स्वतंत्रपणे तपासणी केली असल्याचे प्रमाणपत्रावर दर्शविण्यात आले नसेल तर, असा आदेश काढण्यात येणार नाही.

**स्वीकृति-आदेशासाठी प्राधिकार असणे.**

**३१.** ह्या प्रकरणाखाली काढण्यात आलेल्या स्वीकृति-आदेशामध्ये,—

(एक) अर्जदाराला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला ; किंवा

(दोन) अर्जाव्यतिरिक्त अन्यथा काढण्यात आलेल्या स्वीकृति-आदेशाच्या बाबतीत आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाने असे करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला ;

त्याने मनोरुग्ण व्यक्तीस अशा आदेशामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी घेऊन जाण्याचे किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आंतररुग्ण म्हणून दाखल करण्याचे व उपचार करून घेण्याचे किंवा यथास्थिति, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ज्या ठिकाणी त्याला हलविण्यात येईल, अशा कोणत्याही मनोचिकित्सा

रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्याचे आणि ठेवण्याचे पुरेसे प्राधिकार असतील आणि प्रभारी वैद्यकीय अधिकारी अशा आदेशाचे अनुपालन करण्यासाठी बांधील राहील :

परंतु असे की, जर प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास मनोचिकित्सा रुग्णालयातील किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयातील स्थानसुविधा अपुरी असल्याचे आढळून आले तर, तो, त्या मनोरुग्णास दाखल केल्यानंतर, ही वस्तुस्थिती जो आदेश काढतो त्या दंडाधिकाऱ्याला किंवा जिल्हा न्यायालयाला कळवील आणि त्यानंतर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा न्यायालय त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, असा आदेश काढील :

परंतु आणखी असे की, प्रत्येक स्वीकृति-आदेश,—

(क) जर मनोरुग्ण व्यक्तीस त्यात नमूद केलेल्या ठिकाणी त्या कालावधीमध्ये दाखल केले गेले नसेल तर, आदेश ज्या दिनांकास काढण्यात आला होता त्या दिनांकापासून, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर ; आणि

(ख) या अधिनियमाच्या तरतुदीनुसार मनोरुग्ण व्यक्तीला रजा देण्यात आल्यानंतर ; परिणामक्षम राहणार नाही.

**प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास स्वीकृति-आदेशाची प्रत पाठवणे.**

**३२.** स्वीकृति-आदेश काढणारा प्रत्येक दंडाधिकारी किंवा जिल्हा न्यायालय, मनोरुग्ण व्यक्तीस ज्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करावयाचे आहे अशा रुग्णालयाच्या किंवा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास, आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्रे व तपशीलवार विवरण यांच्या प्रतींसह अशा आदेशाची प्रमाणित प्रत तात्काळ पाठवील.

**ज्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात स्वीकृति आदेशाद्वारे दाखल करण्याचा निदेश देता येतो त्यास निर्बंध.**

**३३.** कोणताही दंडाधिकारी किंवा कोणतेही जिल्हा न्यायालय, ज्या राज्यात अधिकारितेचा वापर करीत असेल, त्या राज्याबाहेरील कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात, कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीला आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी स्वीकृति-आदेश संमत करणार नाही :

परंतु असे की, जर राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे व अशा अन्य राज्याच्या शासनाची संमती मिळाल्यानंतर, दंडाधिकारी किंवा जिल्हा न्यायालय यांना त्या संबंधात प्राधिकृत केले तर, कोणत्याही इतर राज्यात स्थित असलेल्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्यासाठी किंवा त्या ठिकाणी ठेवण्यासाठी आदेश संमत करण्यात येईल.

**आदेशात किंवा दस्तऐवजात सुधारणा करणे.**

**३४.** कोणत्याही मनोरुग्ण असलेल्या व्यक्तीला स्वीकृति-आदेशान्वये कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात दाखल करण्यात आल्यानंतर, जर त्याला ज्या आदेशान्वये दाखल करण्यात आले होते किंवा ठेवण्यात आले होते तो आदेश किंवा ज्या दस्तऐवजांच्या आधारे असा आदेश काढण्यात आला होता ते दस्तऐवज सदोष किंवा चुकीचे असल्याचे आढळून आले तर, त्या आदेशात किंवा दस्तऐवजात त्यानंतर कोणत्याही वेळी दंडाधिकारी किंवा जिल्हा न्यायालय यांच्या परवानगीने, ज्या व्यक्तीने किंवा ज्या व्यक्तींनी त्यावर स्वाक्षरी केलेली आहे त्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून सुधारणा करण्यात येईल आणि अशा सुधारणा करण्यात आल्यानंतर आदेश परिणामक्षम राहील किंवा तो आदेश अशा प्रकारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे मूलतः तयार करण्यात आला होता किंवा तो ज्या दस्तऐवजांच्या आधारे काढण्यात आला होता ते दस्तऐवज सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे मूलतः सादर करण्यात आले होते त्याप्रमाणे नेहमीच परिणामक्षम होते असे मानण्यात येईल.

**ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता त्या व्यक्तीऐवजी बदली व्यक्तीची नियुक्ती करण्याचा अधिकार.**

**३५.** (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून दंडाधिकाऱ्याला, लेखी आदेशाद्वारे (यात यापुढे ज्याला बदली आदेश असे संबोधण्यात आले आहे) ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता त्याची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या अशी कर्तव्ये व जबाबदाऱ्या स्वीकारण्यास इच्छुक असलेल्या अशा अन्य व्यक्तीकडे त्या अधिनियमाअन्वये हस्तांतरित करता येतील आणि त्यानंतर अशा कोणत्याही अन्य व्यक्तीस, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी जिच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता ती ही व्यक्ती असल्याचे समजण्यात येईल व नंतरच्या व्यक्तीसाठी या अधिनियमातील सर्व निर्देशांचा अन्वयार्थ त्यानुसार लावण्यात येईल :

परंतु असे की, बदलीच्या अशा आदेशामुळे ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता ती व्यक्ती किंवा तिचे निधन झाले असल्यास तिचा वैध प्रतिनिधी बदली आदेशाच्या दिनांकापूर्वी पत्करण्यात आलेल्या कोणत्याही दायित्वातून मुक्त होणार नाही.

(२) दंडाधिकारी, बदलीचा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता ती व्यक्ती हयात असेल तर, त्या व्यक्तीस आणि दंडाधिकाऱ्याच्या मते, मनोरुग्ण व्यक्तीच्या ज्या कोणत्याही नातेवाईकास नोटीस पाठवणे उचित ठरेल अशा नातेवाईकास नोटीस पाठवील.

(३) पोटकलम (२) अन्वये नोटिशीत, जिच्या नावे बदली आदेश काढण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे त्या व्यक्तीचे नाव आणि असा आदेश काढण्यासाठी जर कोणतेही आक्षेप असतील तर ते आक्षेप ज्या दिनांकापर्यंत विचारात घेण्यात येतील तो दिनांक (नोटीस काढण्याच्या दिनांकापासून वीस दिवसांपेक्षा कमी दिवस नसतील असा दिनांक) विनिर्दिष्ट केलेला असेल.

(४) पोटकलम (३) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा ज्या दिनांकास कार्यवाही स्थगित करण्यात येईल अशा नंतरच्या कोणत्याही दिनांकास, दंडाधिकारी, ज्या व्यक्तीस नोटीस पाठवण्यात आली होती त्या व्यक्तीने घेतलेला कोणताही आक्षेप किंवा मनोरूग्ण व्यक्तीच्या कोणत्याही इतर नातेवाईकाने घेतलेला कोणताही आक्षेप विचारात घेईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा अशा कोणत्याही व्यक्तीच्या वतीने किंवा तिच्या नातेवाईकाने सादर केला असेल असा सर्व साक्षीपुरावा स्वीकारील आणि दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे अशी चौकशी केल्यानंतर बदली आदेश काढील किंवा बदली आदेश काढण्यापासून परावृत्त राहील :

परंतु असे की, ज्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वीकृति-आदेश काढण्यात आला होता ती व्यक्ती मरण पावली असेल व तिच्या जागी अन्य कोणतीही व्यक्ती इच्छुक असेल आणि ती इच्छुक व्यक्ती, आधीच्या व्यक्तीची या अधिनियमाखालील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यास योग्य आहे असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल तर, तो पोटकलम (१) च्या परंतुकामध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींच्या अधीन, तशा आशयाचा आदेश काढील.

(५) या कलमान्वये कोणताही बदली आदेश काढताना दंडाधिकारी, मनोरुग्ण व्यक्तीच्या जवळच्या नातलगास प्राथम्य देईल. मात्र, असे प्राथम्य दिल्याने ते मनोरुग्ण व्यक्तीच्या हिताचे ठरणार नाही असे दंडाधिकाऱ्यास वाटत असेल तर, तो त्याबाबतची कारणे लिखित स्वरूपात अभिलिखित करून असे प्राथम्य देणार नाही.

(६) दंडाधिकाऱ्याला, या कलमान्वये करण्यात येणाऱ्या चौकशीच्या खर्चाचे त्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून किंवा मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेमधून प्रदान करण्यासाठी आदेश काढता येईल.

(७) पोटकलम (२) अन्वये कोणतीही नोटीस, ती ज्या व्यक्तीस पाठवणे उद्देशित आहे अशा व्यक्तीचा जो शेवटचा पत्ता माहीत असेल त्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवण्यात येईल.

**विवक्षित कलमान्वये दंडाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणे व कार्ये पार पाडणे यासाठी सक्षम अधिकारी.**

**३६.** जेथे पोलीस आयुक्ताची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्या कोणत्याही क्षेत्रांमध्ये कलम २३, २४, २५ व २८ अन्वये दंडाधिकाऱ्याच्या सर्व अधिकारांचा वापर पोलीस आयुक्तामार्फत करण्यात येईल किंवा कार्ये पार पाडण्यात येतील आणि पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा निम्न दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत या अधिनियमाअन्वये पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यात येतील.

## प्रकरण पाच

## मनोरुग्ण व्यक्तीची तपासणी करणे, त्यांना सोडून देणे, अनुपस्थित राहण्यासाठी परवानगी देणे आणि दुसऱ्या जागी हलवणे

### भाग एक

### तपासणी

**वीक्षक अधिकाऱ्यांची नियुक्ती.**

**३७.** (१) राज्य शासन किंवा यथास्थिति, केंद्र सरकार प्रत्येक मनोचिकित्सा रुग्णालयासाठी व प्रत्येक मनोचिकित्सा शुश्रूषालयासाठी पाचपेक्षा कमी नसतील इतक्या वीक्षक अधिकाऱ्यांची नियुक्ती करील. त्यांपैकी किमान एकजण विशेषकरून तो मनोचिकित्सक असलेला वैद्यकीय अधिकारी असेल आणि दोन सामाजिक कार्यकर्ते असतील.

(२) राज्याच्या वैद्यकीय सेवांचा प्रमुख किंवा विशेषकरून मनोचिकित्सक असलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती राज्यातील सर्व मनोचिकित्सा रुग्णालये, मनोचिकित्सा शुश्रूषालये यांचा पदसिद्ध वीक्षक अधिकारी असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये वीक्षक अधिकारी म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची पात्रता आणि त्यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**वीक्षक अधिकाऱ्यांनी दरमहा निरीक्षण करणे.**

**३८.** कमीत कमी तीन वीक्षक अधिकारी, ज्या मनोचिकित्सा रुग्णालयासाठी किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयासाठी वीक्षक अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली असेल अशा रुग्णालयाच्या किंवा शुश्रूषालयाच्या प्रत्येक भागाचे दर महिन्याला निदान एकदा तरी, संयुक्तपणे निरीक्षण करतील आणि कलम १७ अन्वये, स्वेच्छेने दाखल होणारा रुग्ण म्हणून दाखल

करण्यात आलेल्या प्रत्येक अज्ञान व्यक्तीची व परिस्थितीनुसार शक्य होईल तेथवर तेथे दाखल करण्यात आलेल्या इतर प्रत्येक मनोरुग्ण व्यक्तीची तसेच, लगतपूर्वीच्या संयुक्त निरीक्षणानंतर तात्काळ दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक मनोरुग्ण व्यक्तीला दाखल करून घेण्याबाबतचा आदेश आणि त्याच्या संबंधातील वैद्यकीय प्रमाणपत्रे यांची तपासणी करतील आणि अभिप्रायासाठी ठेवलेल्या नोंदवहीमध्ये अशा रुग्णालयाचे किंवा शुश्रूषालयाचे व्यवस्थापन, त्यांची स्थिती तसेच, तेथे दाखल असलेल्या आंतररुग्णांची स्थिती यांबाबत त्यांना योग्य वाटतील असे अभिप्राय नोंदवतील :

परंतु, असे की, एखाद्या आंतररुग्णाचा वैयक्तिक अभिलेख हा गोपनीय स्वरूपाचा आहे असे जर प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मत असेल तर, अशा कोणत्याही आंतररुग्णाच्या वैयक्तिक अभिलेखांचे निरीक्षण करण्यास वीक्षक अधिकारी हक्कदार असणार नाहीत :

परंतु आणखी असे की, जर मनोचिकित्सा रुग्णालयाचे किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाचे संयुक्त निरीक्षण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला कोणताही वीक्षक अधिकारी, अशा संयुक्त निरीक्षणासाठी लागोपाठच्या तीन महिन्यात सहभागी झाला नाही तर, तो ते वीक्षक अधिकाऱ्याचे पद धारण करणे बंद होईल.

**मनोरुग्ण असणाऱ्या कैद्यांचे निरीक्षण करणे.**

**३९.** (१) कलम ३८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वायुसेना अधिनियम, १९५० याच्या कलम १४४ च्या तरतुदींअन्वये, किंवा सेना अधिनियम, १९५० याच्या कलम १४५ च्या तरतुदींअन्वये, किंवा नौसेना अधिनियम, १९५७ याच्या कलम १४३ किंवा कलम १४४ च्या तरतुदींअन्वये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ३३० किंवा कलम ३३५ च्या तरतुदींअन्वये जर कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध अभिरक्षेत ठेवण्यात आले असेल तर,—

**१९५० चा ४५.** **१९५० चा ४६.** **१९५७ चा ६२.** **१९७३ चा २.**

(एक) अशा व्यक्तीस कारागृहामध्ये स्थानबद्ध करण्यात आले असेल तर, कारागृह महानिरीक्षक ; आणि

(दोन) अशा व्यक्तीस मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवण्यात आले असेल तर, कलम ३७ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेले सर्व किंवा किमान एका सामाजिक कार्यकर्त्यासह कोणतेही तीन वीक्षक अधिकारी,—

त्या व्यक्तीच्या मानसिक स्थितीचा अंदाज घेण्यासाठी दर तीन महिन्यांतून एकदा, त्या व्यक्तीला जेथे ठेवण्यात आले असेल तेथे तिची भेट घेतील आणि ज्या प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये त्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या प्राधिकाऱ्यास त्या व्यक्तीच्या मानसिक स्थितीबाबतचा अहवाल देतील.

(२) राज्य शासनास, पोटकलम (१) अन्वये, कारागृह महानिरीक्षकाची जी कार्ये आहेत ती सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही एका अधिकाऱ्याला, अधिकार प्रदान करता येतील.

(३) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीला ज्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवण्यात आले असेल त्या मनोचिकित्सा रुग्णालयाचा किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी, ज्या प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये अशा व्यक्तीला ठेवण्यात आले असेल त्या प्राधिकाऱ्याला, दर सहा महिन्यांतून एकदा त्या व्यक्तीच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीबाबत अहवाल देईल.

(४) मनोचिकित्सक किंवा जेथे मनोचिकित्सक उपलब्ध नसेल तेथे राज्य शासनाने याबाबतीत अधिकार प्रदान केलेला वैद्यकीय अधिकारी, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विविध अधिनियमांच्या तरतुदींअन्वये कारागृहात स्थानबद्ध करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीची दर तीन महिन्यांतून एकदा भेट घेईल आणि असा मनोचिकित्सक किंवा, यथास्थिति असा वैद्यकीय अधिकारी ज्या प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये अशा व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या प्राधिकाऱ्याला, या व्यक्तीच्या मानसिक व शारीरिक स्थितीसंबंधीचा विशेष अहवाल देईल.

## भाग दोन

## रुग्णास रुग्णालयातून सोडणे

**रुग्णाला रुग्णालयातून सोडण्याबाबतचा प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याचा आदेश.**

**४०.** (१) प्रकरण चारमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मनोचिकित्सा रुग्णालयाच्या किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास दोन वैद्यकीय व्यवसायींपैकी एक जण शक्यतोवर मनोचिकित्सक असेल, अशा वैद्यक व्यवसायींच्या शिफारशीवरून, लेखी आदेशाद्वारे, स्वेच्छेने दाखल झालेला रुग्ण खेरीजकरून त्या रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात ठेवण्यात आलेल्या किंवा आंतररुग्ण म्हणून उपचार घेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला सोडण्याबाबत निदेश देता येईल आणि त्यानंतर अशा व्यक्तीला मनोचिकित्सा रुग्णालयामधून किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामधून सोडण्यात येईल :

परंतु असे की, मनोरुग्ण कैद्याच्या बाबतीत, कैदी अधिनियम, १९०० याच्या कलम ३० मध्ये किंवा अन्य कोणत्याही संबद्ध कायद्यामध्ये जी तरतूद करण्यात आली आहे त्या व्यतिरिक्त अन्य प्रकारे या पोटकलमाअन्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही. **१९०० चा ३.**

(२) कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या आदेशानुसार ठेवण्यात आलेल्या किंवा आंतररुग्ण म्हणून उपचार घेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, पोटकलम (१) अन्वये सोडण्याबाबत कोणताही आदेश काढण्यात आला असेल तर, प्रभारी वैद्यकीय अधिकारी ताबडतोब त्या आदेशाची प्रत त्या प्राधिकाऱ्यास पाठवील.

**मनोरुग्ण व्यक्तींच्या अर्जावरून सोडून देणे.**

**४१.** या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या अर्जानुसार काढण्यात आलेल्या आदेशान्वये मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या व्यक्तीच्या अर्जानुसार असा आदेश काढण्यात आला होता त्या व्यक्तीने, प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे तिला सोडून देण्याबाबत अर्ज केल्यास सोडण्यात येईल :

परंतु असे की, ती व्यक्ती धोकादायक आणि पूर्ण बरी न झालेली आहे असे प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने लेखी स्वरूपात प्रमाणित केल्यास अशा कोणत्याही व्यक्तीस सोडण्यात येणार नाही.

**नातेवाईक किंवा मित्र इत्यादींकडून योग्य काळजी घेण्याबाबतचे वचनपत्र घेऊन मनोरुग्ण व्यक्तीला सोडण्यासाठी आदेश देणे.**

**४२.** (१) कलम २२, कलम २४ किंवा कलम २५ अन्वये मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये ठेवलेल्या मनोरुग्ण व्यक्तीची काळजी घेण्यासाठी व देखभाल करण्यासाठी तिला आपल्याकडे सुपूर्द करावे अशी त्या व्यक्तीच्या एखाद्या नातेवाईकाची किंवा मित्राची इच्छा असेल तर, त्याला वैद्यकीय अधिकाऱ्याकडे तसा अर्ज करता येईल आणि तो प्रभारी वैद्यकीय अधिकारी, ज्या प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये मनोरुग्ण व्यक्तीला ठेवण्यात आले असेल त्या प्राधिकाऱ्याकडे तो अर्ज आपल्या अभिप्रायासह पाठवील.

(२) पोटकलम (१) अन्वये एखादा अर्ज प्राप्त झाल्यावर, त्या नातेवाईकाने किंवा मित्राने त्या मनोरुग्ण व्यक्तीची योग्य ती काळजी घेतल्याबाबतचे वचन देणारे, आणि ती मनोरुग्ण व्यक्ती, स्वतःला किंवा इतर व्यक्तींना कोणत्याही प्रकारची इजा पोहचवणार नाही अशी हमी देणारे, तो प्राधिकारी याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा रकमेचे, जामीनदारासह किंवा जामीनदाराखेरीज असलेले बंधपत्र सादर केल्यावर, तो प्राधिकारी, त्या मनोरुग्ण व्यक्तीला रुग्णालयातून सोडण्याबाबत आदेश देईल आणि त्यानंतर त्या मनोरुग्ण व्यक्तीला रुग्णालयातून सोडण्यात येईल.

**अभिरक्षेत ठेवलेल्या व्यक्तीच्या विनंतीवरून तिला सोडणे.**

**४३.** (१) या अधिनियमाखाली देण्यात आलेल्या आदेशानुसार, अभिरक्षेत ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला (जी मनोरुग्ण कैदी नाही), आपण मानसिक आजारामधून बरे झालो आहोत असे वाटत असेल तर, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार तिला मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामधून सोडण्यासाठी तिला दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या अर्जाच्या पुष्ठ्यर्थ, अर्जदार ज्या मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात उपचार घेत होता त्यांच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याचे किंवा एखाद्या मनोचिकित्सकाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

(३) दंडाधिकाऱ्यास, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यानुसार त्या व्यक्तीला सोडण्याचा किंवा तिचा अर्ज खारीज करण्याचा आदेश संमत करता येईल.

**नंतरच्या चौकशीत निकोप मनाच्या आढळून आलेल्या व्यक्तीला सोडणे.**

**४४.** या अधिनियमाखाली काढण्यात आलेल्या स्वीकृति आदेशानुसार मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामध्ये ठेवण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, प्रकरण सहाच्या तरतुदीनुसार तिची कसून चौकशी करण्यात आल्यानंतर, निकोप मनाची किंवा स्वतःची काळजी घेण्यास व स्वतःची कामे करण्यास समर्थ असल्याचे आढळून आल्यास, प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला, जिल्हा न्यायालयाने यथोचितरीत्या प्रमाणित केलेली अशा निष्कर्षाची प्रत सादर केल्यानंतर, अशा व्यक्तीस, अशा रुग्णालयामधून किंवा शुश्रूषालयामधून तात्काळ सोडता येईल.

## भाग तीन

## अनुपस्थितीची परवानगी

**अनुपस्थितीची परवानगी.**

**४५.** (१) कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये आंतररुग्ण म्हणून उपचार घेत असलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीच्या वतीने (मनोरुग्ण कैदी नसलेल्या), तिच्या अनुपस्थितीच्या परवानगीसाठी प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे :–

(क) पतीने किंवा पत्नीने केलेल्या अर्जावरून दाखल करून घेण्यात आलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या बाबतीत, तिच्या पती किंवा पत्नीला, किंवा जेथे पती किंवा पत्नी मानसिक किंवा शारीरिकदृष्टया आजारी असल्याच्या किंवा भारतात नसल्याच्या किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अर्ज करण्यास असमर्थ असेल तेव्हा पती किंवा पत्नीकडून प्राधिकृत करण्यात आले असेल अशा कोणत्याही नातेवाईकाला ; किंवा

(ख) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, मनोरुग्ण व्यक्तीला ज्या व्यक्तीच्या अर्जावरून दाखल करून घेण्यात आले होते त्या व्यक्तीला,

अर्ज करता येईल :

परंतु असे की, सज्ञान वयाची नसलेल्या व्यक्तीला या पोटकलमान्वये अर्ज करता येणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या प्रत्येक अर्जासोबत, प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेचे एक बंधपत्र प्रतिभूतीसह किंवा त्याच्याविना जोडण्यात येईल आणि त्यात–

(एक) मनोरुग्ण व्यक्तीची योग्य काळजी घेण्याची ;

(दोन) मनोरुग्ण व्यक्तीस स्वत:ला किंवा अन्य व्यक्तींना इजा करण्यापासून प्रतिबंध करण्याची, आणि

(तीन) अनुपस्थित राहण्याची परवानगी दिलेला कालावधी समाप्त होईल त्या दिवशी मनोरुग्ण व्यक्तीला मनोचिकित्सा रुग्णालय किंवा यथास्थिति, मनोचिकित्सा शुश्रूषालय यांमध्ये परत आणण्याची, हमी घेतलेली असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज प्राप्त झाल्यानंतर, प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी आणि मनोरुग्ण व्यक्तीच्या आरोग्याच्या व त्याच्या स्वत:च्या सुरक्षिततेच्या किंवा इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आदेशामध्ये घालण्यात येतील अशा शर्तीच्या अधीन राहून, तो मनोरुग्ण व्यक्तीला अनुपस्थितीची परवानगी देईल :

परंतु असे की, रुग्णाला, या पोटकलमान्वये एकूण जितक्या दिवसांच्या अनुपस्थितीची परवानगी देण्यात आली असेल तो कालावधी साठ दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(४) या कलमान्वये मनोरुग्ण व्यक्तीला देण्यात आलेल्या अनुपस्थितीच्या परवानगीचा कालावधी संपल्यावर, तिला मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय येथे परत आणण्यात आले नाही तर, त्याबाबत त्या रुग्णालयाचा किंवा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी, ते रुग्णालय किंवा शुश्रूषालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये असेल त्या दंडाधिकाऱ्यास तात्काळ ही वस्तुस्थिती कळवील आणि दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर यथास्थिति, मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय येथे रुग्णाला परत आणण्याचा निदेश देणारा आदेश देईल.

(५) कलम १५ किंवा कलम १६ मध्ये निर्देशित केलेल्या स्वेच्छारुग्णास या कलमातील कोणत्याही बाबी लागू न होता, कलम १८ मधील तरतुदी लागू होतील.

**दंडाधिकाऱ्याने अनुपस्थितीची परवानगी देणे.**

**४६.** (१) मनोरुग्ण व्यक्तीने कलम ४५ अन्वये मागितलेली अनुपस्थितीची परवानगी देण्याचे प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने नाकारले तर, अर्जदारास, मनोरुग्ण व्यक्तीला जेथे ठेवण्यात आले असेल ते मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये असेल त्या दंडाधिकाऱ्याकडे मनोरुग्ण व्यक्तीच्या अनुपस्थितीची परवानगी मागण्यासाठी अर्ज करता येईल आणि दंडाधिकाऱ्याला तसे करणे आवश्यक असल्याबाबत त्याची खात्री पटल्यावर, आणि पोटकलम (२) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने बंधपत्र करून दिल्यावर, आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अशा कालावधीसाठी, आणि अशा शर्तीच्या अधीन मनोरुग्ण व्यक्तीला अनुपस्थितीची परवानगी देता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेले प्रत्येक बंधपत्र प्रतिभूतीसह किंवा त्याविना दंडाधिकारी निश्चित करील अशा रकमेचे असेल आणि त्यामध्ये कलम ४५ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशित बाबींची हमी अंतर्भूत केलेली असेल.

(३) दंडाधिकारी, आपल्या आदेशाची एक प्रत प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवील व प्रभारी वैद्यकीय अधिकारी, असा आदेश प्राप्त झाल्यावर, मनोरुग्ण व्यक्तीच्या अनुपस्थितीची परवानगी या कलमान्वये ज्या व्यक्तीच्या अर्जावरून देण्यात आली होती, त्या व्यक्तीकडे, मनोरुग्ण व्यक्तीला सुपूर्द करील.

## भाग चार

## **स्थानांतरण**

**मनोरुग्ण व्यक्तीचे एका मनोचिकित्सा रुग्णालयामधून किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामधून अन्य मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये स्थानांतरण करणे.**

**४७.** (१) कलम १५ किंवा कलम १६ मध्ये निर्देशित केलेले स्वेच्छारुग्ण खेरीज करून अन्य कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीला राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीनतेने राज्यातील कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामधून, अन्य मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये, किंवा, अन्य कोणत्याही राज्य शासनाच्या संमतीने त्या राज्यातील कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामध्ये स्थानांतरित करता येईल :

परंतु असे की, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या अर्जावर दिलेल्या आदेशावरून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामध्ये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीचे स्थानांतरण अर्जदाराला त्याबाबत कळवल्याशिवाय करण्यात येणार नाही.

(२) राज्य शासनास, कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीला त्या वेळेपुरते जेथे ठेवले असेल त्या ठिकाणाहून, त्याला योग्य वाटेल असे राज्यातील कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय, मनोचिकित्सा शुश्रूषालय, कारागृह किंवा सुरक्षित अभिरक्षेचे अन्य ठिकाण येथे किंवा अन्य कोणत्याही राज्य शासनाच्या संमतीने त्या राज्यातील कोणतेही मनोचिकित्सा रुग्णालय, मनोचिकित्सा शुश्रूषालय, कारागृह किंवा त्या राज्यातील सुरक्षित अभिरक्षेचे इतर ठिकाण येथे, मनोरुग्ण व्यक्तीचे स्थानांतरण करण्याबाबत निदेश देण्यासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देता येईल.

**४८.** या अधिनियमानुसार देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे एखादे मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय यामध्ये आणण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस, कोणत्याही कायद्याद्वारे तिचे स्थानांतरण किंवा तिची मुक्तता करण्यात येईपर्यंत तेथेच ठेवण्यात येईल, किंवा, यथास्थिति, आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यात येईल, आणि अशा रुग्णालयामधून किंवा शुश्रूषालयामधून ती निसटून गेल्यास, अशा आदेशाच्या आधारे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा अशा रुग्णालयाचा किंवा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी किंवा अन्य अधिकारी किंवा कर्मचारी याच्याकडून किंवा प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या अशा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून तिला पुन्हा पकडून आणता येईल आणि अशा रुग्णालयात किंवा शुश्रूषालयात पोहोचवण्यात येईल, दाखल करून घेण्यात येईल आणि ठेवण्यात येईल किंवा यथास्थिति, आंतररुग्ण म्हणून ठेवण्यात येईल : **विवक्षित प्रकरणांमध्ये दाखल करणे, ठेवणे व पुन्हा पकडणे.**

परंतु असे की, मनोरुग्ण व्यक्तीच्या (मनोरुग्ण कैदी नव्हे) बाबतीत, या कलमाखाली पूर्वोक्तप्रमाणे पुन्हा पकडून आणण्याच्या अधिकाराचा वापर ती निसटून गेल्याच्या दिनांकापासून एक महिना उलटून गेल्यानंतर करता येणार नाही.

**४९.** पूर्वगामी कोणत्याही तरतुदीं अन्वये संमत करण्यात आलेल्या, दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये त्या दंडाधिकाऱ्याने आपल्या अधिकारितेचा वापर केला असेल त्या क्षेत्रातील जिल्हा न्यायालयात, त्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल आणि अशा अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल. **दंडाधिकाऱ्याच्या आदेशावर अपील करणे.**

## प्रकरण सहा

## मालमत्ता बाळगणाऱ्या, स्वतःची व्यक्तिशः अभिरक्षा करणाऱ्या व स्वतःच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करणाऱ्या अभिकथित मनोरूग्ण व्यक्तीची कसून न्यायिक चौकशी करणे.

**५०.** (१) अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीने मालमत्ता धारण केलेली असेल त्या बाबतीत तिच्या मानसिक स्थितीसंबंधातील कसून चौकशी करण्याबाबतचा अर्ज हा एकतर,— **कसून न्यायिक चौकशी करण्यासाठी अर्ज करणे.**

(क) तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडून, किंवा

**१९२५ चा ३९.** (ख) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अन्वये नियुक्त केलेल्या लोक अभिरक्षकाकडून, किंवा

(ग) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ज्या राज्यात राहत असेल त्या राज्याच्या महाअधिवक्त्याकडून, किंवा

(घ) अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेमध्ये जमीन किंवा जमिनीतील हितसंबंध यांचा अंतर्भाव असेल किंवा जेथे अशी मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग, त्या राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या पाल्याधिकरणाकडे, त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी कायदेशीरपणे सुपूर्द करता येईल अशा स्वरूपाचा असेल तर, अशी जमीन ज्या जिल्ह्यात स्थित असेल तेथील जिल्हाधिकाऱ्याकडून, अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती, ज्या जिल्हा न्यायालयाच्या अधिकारितेतील स्थानिक सीमांमध्ये रहात असेल त्या जिल्हा न्यायालयात अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर, जिल्हा न्यायालय, नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी व अशावेळी हजर राहण्यासाठी अभिकथित मनोरूग्ण व्यक्तीवर, व्यक्तिशः जाऊन किंवा त्याला याग्य वाटेल अशा अन्य पद्धतीने नोटीस बजावील, किंवा जिल्हा न्यायालयाकडून किंवा, जिल्हा न्यायालयास मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधात ज्याच्याकडून अहवाल मागवता येईल अशा इतर कोणत्याही व्यक्तीकडून तपासणी करून घेण्यासाठी मनोरुग्ण व्यक्तीस उक्त ठिकाणी व उक्त वेळी हजर करण्याकरिता, अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीचा ताबा असलेल्या व्यक्तीवर, त्याच रीतीने नोटीस बजावील :

परंतु असे की, अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती जर स्त्री असेल आणि ती जेथे राहत असेल तेथील प्रचलित रुढीनुसार किंवा ती ज्या धर्माची आहे त्या धर्मानुसार तिला लोकांसमक्ष उपस्थित होण्यास भाग पाडता येणार नसेल तर जिल्हा न्यायालयास, दिवाणी **१९०८ चा ५.** प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या तरतुदींनुसार आयोगपत्र पाठवून तिची तपासणी करता येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये देण्यात येणाऱ्या नोटिशीची प्रत, अर्जदार व्यक्तीला व अभिकथित मनोरुग्ण व्यक्तीच्या कोणत्याही नातेवाईकाला किंवा जिल्हा न्यायालयाच्या मते, कसून न्यायिक चौकशी करण्याची नोटीस जिला दिली पाहिजे अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला, देण्यात येईल.

(४) ज्यासाठी अर्ज करण्यात आला होता ती कसून चौकशी करण्यासाठी, जिल्हा न्यायालयास दोन किंवा अधिक व्यक्तींची, न्यायसहायक म्हणून काम करण्यासाठी नियुक्ती करता येईल.

**कसून चौकशी केल्यानंतर जिल्हा न्यायालयाने ज्या मुद्यांवरून निष्कर्ष काढावयाचे आहेत ते मुद्दे.**

**५१.** जिल्हा न्यायालय, कसून चौकशी केल्यानंतर खालील बाबीसंबंधात आपले निष्कर्ष नोंदवील,—

(एक) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ही खरोखरीच मनोरुग्ण आहे किंवा कसे ; आणि

(दोन) अशी व्यक्ती मनोरुग्ण असेल त्याबाबतीत ती स्वतःची काळजी घेण्यास व आपल्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास ती असमर्थ आहे किंवा फक्त आपल्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी असमर्थ आहे किंवा कसे.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकाची व तिच्या मालमत्तेच्या व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यासाठी तरतूद करणे.**

**५२.** (१) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ही खरोखरीच मनोरुग्ण असून स्वतःची काळजी घेण्यास आणि आपल्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास असमर्थ असल्याचा निष्कर्ष जिल्हा न्यायालयाने नोंदविला असेल त्याबाबतीत, जिल्हा न्यायालय, तिची स्वतःची काळजी घेण्यासाठी कलम ५३ अन्वये पालकाच्या नियुक्तीचे व मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी कलम ५४ अन्वये व्यवस्थापकाच्या नियुक्तीचे आदेश काढील.

(२) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ही खरोखरीच मनोरुग्ण असून व तिच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास असमर्थ परंतु स्वतःची काळजी घेण्यास समर्थ असल्याचा निष्कर्ष जिल्हा न्यायालयाने नोंदविला असल्यास, जिल्हा न्यायालय, कलम ५४ अन्वये तिच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनाबाबतचे आदेश काढील.

(३) अभिकथित मनोरुग्ण व्यक्ती ही मनोरुग्ण नसल्याचा निष्कर्ष जिल्हा न्यायालयाने नोंदवला तर, जिल्हा न्यायालय त्या संबंधातील अर्ज खारीज करील.

(४) जिल्हा न्यायालयास एकाच व्यक्तीची पालक व व्यवस्थापक म्हणून पोटकलम (१) अन्वये नियुक्ती करणे इष्ट वाटल्यास, तसे करता येईल.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकाची नियुक्ती.**

**५३.** (१) मनोरुग्ण व्यक्ती स्वतःची काळजी घेण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत जिल्हा न्यायालय किंवा कलम ५४ च्या पोटकलम (२) अन्वये निदेश देण्यात आले असतील त्याबाबतीत जिल्हाधिकारी, कोणत्याही योग्य व्यक्तीची, तिचा पालक म्हणून नियुक्ती करू शकेल.

(२) जिल्हाधिकारी, पोटकलम (१) अन्वये आपली कर्तव्ये पार पाडताना, राज्य शासन किंवा त्याने याबाबत प्रधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाच्या व नियंत्रणाच्या अधीन राहील.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापकाची नियुक्ती.**

**५४.** (१) मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास असमर्थ असलेल्या मनोरुग्ण व्यक्तीची मालमत्ता, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार पाल्याधिकरणाकडे सुपूर्द करण्यासारखी असेल तर, जिल्हा न्यायालय, पाल्याधिकरणाला अशा मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी प्राधिकार देईल, आणि त्यानंतर, अशा कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या कायद्यानुसार, अशा मालमत्तेचे व्यवस्थापन पाल्याधिकरणाकडून हाती घेण्यात येईल.

(२) मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेमध्ये संपूर्ण जमिनीचा किंवा तिच्या भागाचा किंवा जमिनीतील कोणत्याही हितसंबंधाचा अंतर्भाव होत असेल व पाल्याधिकरणाला त्याचा ताबा घेता येत नसेल अशा प्रकरणात जिल्हा न्यायालयास, ती जमीन ज्या जिल्ह्यात स्थित असेल त्या जिल्हाधिकाऱ्याची संमती घेऊन, जिल्हाधिकाऱ्याला, मनोरूग्ण व्यक्तीचा आणि पाल्याधिकरणाला ज्याचा ताबा घेता येत नसेल अशा, त्या व्यक्तीच्या मालमत्तेमधील भागाचा किंवा त्यामधील हितसंबंधाचा ताबा घेण्याचा निदेश देता येईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेचे व्यवस्थापन, पाल्याधिकरण किंवा यथास्थिति, जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविता येणार नसेल त्याबाबतीत जिल्हा न्यायालय, अशा मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी कोणत्याही योग्य व्यक्तीची नियुक्ती करील.

**जिल्हाधिकाऱ्याने व्यवस्थापकाची नियुक्ती करणे.**

**५५.** मनोरुग्ण व्यक्तीची मालमत्ता कलम ५४ च्या पोटकलम (२) अन्वये जिल्हा न्यायालयाकडून जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली असेल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाकडून याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी कोणत्याही योग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

**५६.** जिल्हा न्यायालयाकडून किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेची व्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, नियुक्ती प्राधिकाऱ्याद्वारे तशी मागणी करण्यात आल्यास, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेपासून मिळणाऱ्या अशा सर्व जमा रकमांचा हिशेब ठेवण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात आणि अशा प्रतिभूतीसह, अशा रकमेचे एक बंधपत्र निष्पादित करील. **मालमत्ता व्यवस्थापकाने बंधपत्र निष्पादित करणे.**

**५७.** (१) मनोरुग्ण व्यक्तीच्या वैध वारसदाराची अशी नियुक्ती ही तिच्या हितासाठी आहे असे जिल्हा न्यायालयास किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्यास लेखी नमूद करावयाच्या कारणांस्तव वाटत असल्याखेरीज मनोरुग्ण व्यक्तीची वैध वारसदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीची, कलम ५३, ५४ किंवा ५५ अन्वये अशा मनोरुग्ण व्यक्तीची पालक म्हणून किंवा, यथास्थिति, तिच्या मालमत्तेचा व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली जाणार नाही. **पालकाची व व्यवस्थापकाची नियुक्ती आणि पारिश्रमिक.**

(२) या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकास किंवा त्याच्या मालमत्तेच्या व्यवस्थापकास किंवा त्या दोघांनाही नियुक्ती प्राधिकारी निर्धारित करील असा भत्ता, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेमधून प्रदान करण्यात येईल.

**५८.** (१) या अधिनियमान्वये मनोरुग्ण व्यक्तीचा पालक किंवा त्याच्या मालमत्तेची व्यवस्थापक किंवा दोन्ही म्हणून नियुक्त करण्यात येणारी प्रत्येक व्यक्ती, मनोरुग्ण व्यक्तीची किंवा त्याच्या मालमत्तेची किंवा दोहोंची काळजी घेईल, तसेच, अशा मनोरुग्ण व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी घेईल. **पालक व व्यवस्थापकाची कर्तव्ये.**

(२) जेथे मनोरुग्ण व्यक्तीचा पालक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती ही तिच्या मालमत्तेचा व्यवस्थापक म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीहून भिन्न असेल तेथे, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेचा व्यवस्थापक, मनोरुग्ण व्यक्ती आणि त्याच्यावर अवलंबून असलेले कुटुंब सदस्य यांचा सांभाळ करण्यासाठी, पालक म्हणून त्याची नियुक्ती करणाऱ्या प्राधिकाऱ्याने निश्चित केलेल्या भत्त्याचे, मनोरुग्ण व्यक्तीच्या पालकास प्रदान करील.

**५९.** (१) या अधिनियमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक व्यवस्थापक, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मनोरुग्ण व्यक्तीच्या ज्या मालमत्तेसंबंधात त्याची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली असेल त्या मालमत्तेच्या बाबतीत, मनोरुग्ण व्यक्ती, ती अशी मनोरुग्ण नसती तर, तिने मालक म्हणून ज्या अधिकारांचा वापर केला असता त्या अधिकारांचा वापर करील आणि मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेवर केलेल्या हक्कमागण्या पूर्ण करील, आणि त्या संपदेवरील देय असलेली सर्व वैध ऋणे व दायित्वे चुकती करील : **व्यवस्थापकाचे अधिकार.**

परंतु असे की, व्यवस्थापक, जिल्हा न्यायालयाकडून त्याबाबतीत परवानगी घेतल्याशिवाय, मनोरुग्ण व्यक्तीची कोणतीही स्थावर मालमत्ता गहाण ठेवणार नाही, तीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही किंवा विक्री करून, भेट देऊन, अदलाबदल करून वा अन्य कोणत्याही मार्गाने ती हस्तांतरित करणार नाही, किंवा अशी कोणतीही मालमत्ता पाच वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणार नाही.

(२) जिल्हा न्यायालय, व्यवस्थापकाने केलेल्या अर्जावरून, मनोरुग्ण व्यक्तीची कोणतीही स्थावर मालमत्ता गहाण ठेवण्यासाठी, तिच्यावर बोजा चढविण्यासाठी किंवा तिची विक्री, दान, अदलाबदल किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करण्यासाठी किंवा पाच वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता अशी कोणतीही मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्यासाठी, त्या न्यायालयाला लादण्यास योग्य वाटतील अशा शर्ती व निर्बंधांना अधीन राहून त्याला परवानगी देईल.

(३) जिल्हा न्यायालय, त्याच्या परवानगीसाठी आलेल्या अशा प्रत्येक अर्जावरील नोटीस मनोरुग्ण व्यक्तीच्या कोणत्याही नातेवाईकावर किंवा मित्रावर बजावण्याची व्यवस्था करील आणि त्यावर त्याच्या नातेवाईकाने किंवा मित्राने काही आक्षेप घेतले तर, ते विचारात घेतल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, मनोरुग्ण व्यक्तीचे हित लक्षात घेऊन अशी परवानगी देईल किंवा देण्याचे नाकारील.

**६०.** (१) या अधिनियमाअन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक व्यवस्थापक, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, त्याच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यास, मनोरुग्ण व्यक्तीच्या स्थावर मालमत्तेची आणि सर्व मत्तांची आणि मनोरुग्ण व्यक्तीच्या वतीने मिळालेल्या सर्व जंगम मालमत्तांची वस्तुसूची करून, अशा मनोरुग्ण व्यक्तीच्या सर्व उचित हक्कमागण्या आणि त्याला चुकती करावयाची सर्व ऋणे व दायित्वे यांच्या विवरणासह सादर करील. **व्यवस्थापकाने वस्तुसूची व वार्षिक लेखे सादर करणे.**

(२) असा प्रत्येक व्यवस्थापक, उक्त नियुक्ती प्राधिकाऱ्याला, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतरच्या तीन महिन्यांच्या कालावधीत, त्याच्याकडील मालमत्तेचा व मत्तांचा, मनोरुग्ण व्यक्तीमुळे मिळालेल्या व संवितरित केलेल्या रकमा आणि त्याच्याकडील शिल्लक, यांचा लेखा सादर करील.

**जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार अभिहस्तांतरणपत्र निष्पादित करण्याचे व्यवस्थापकाचे अधिकार.**

**६१.** या अधिनियमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक व्यवस्थापक, मनोरुग्ण व्यक्तीच्या नावाने व तिच्या वतीने,—

(क) जिल्हा न्यायालयाने ज्यासाठी परवानगी दिलेली असेल अशी मनोरुग्ण व्यक्तीची मालमत्ता, विक्री करून, गहाण ठेवून वा अन्य मार्गाने हस्तांतरित केल्याबाबतची, सर्व अभिहस्तांतरणपत्रे व विलेख निष्पादित करील ; आणि

(ख) तो व्यक्तिशः, किंवा विश्वस्त व पालक या नात्याने, जिल्हा न्यायालयाच्या आदेशांना अधीन राहून, मनोरुग्ण व्यक्तीच्या वतीने त्यासंबंधात निहित करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील.

**जिल्हा न्यायालयाच्या निदेशानुसार व्यवस्थापकाने संविदेचे पालन करणे.**

**६२.** मनोरुग्ण व्यक्तीने तिच्या मानसिक आजारापूर्वी आपली मालमत्ता किंवा तिचा काही भाग यांच्या विक्रीसाठी किंवा अन्यप्रकारे तिची विल्हेवाट लावण्यासाठी संविदा केली असेल आणि जिल्हा न्यायालयाच्या मते अशा संविदेचे पालन करणे आवश्यक असेल तर, जिल्हा न्यायालय, या अधिनियमाअन्वये नियुक्त केलेल्या व्यवस्थापकास अशा संविदेचे पालन करण्याचे आणि संविदेची पूर्तता करण्याच्या दृष्टीने न्यायालयाला आवश्यक वाटेल असे काम करण्याचे निदेश देईल आणि व्यवस्थापक त्यानुसार काम करण्यास बांधील असेल.

**कामधंद्याची जागा निकालात काढणे.**

**६३.** मनोरुग्ण व्यक्ती, ती मनोरुग्ण होण्यापूर्वी कोणताही कामधंदा करीत असेल आणि तिच्या कामधंद्याची जागा निकालात काढणे हे मनोरुग्ण व्यक्तीच्या हिताचे आहे असे जिल्हा न्यायालयाला आढळून आले तर, न्यायालयाला अशा व्यक्तीच्या मालमत्तेच्या संबंधात या अधिनियमाखाली नियुक्त केलेल्या व्यवस्थापकाला, अशी जागा विकून तिची विल्हेवाट लावण्याचा आणि त्यामधून मिळालेल्या उत्पन्नाचा जिल्हा न्यायालय निदेश देईल त्या पद्धतीने विनियोग करण्याचा निदेश देता येईल आणि, त्यानंतर व्यवस्थापक त्यानुसार कृती करण्यास बांधील असेल.

**व्यवस्थापकाला भाडेपट्ट्याची विल्हेवाट लावता येणे.**

**६४.** मनोरुग्ण व्यक्ती एखाद्या भाडेपट्ट्यास किंवा पोटभाडेपट्ट्यास हक्कदार असेल आणि अशा व्यक्तीच्या मालमत्तेसंबंधात या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या अशा व्यवस्थापकाला, असा भाडेपट्टा किंवा पोटभाडेपट्टा यांची विल्हेवाट करणे हे मनोरुग्ण व्यक्तीच्या हिताचे आहे असे आढळून आले असेल तर, अशा व्यवस्थापकास जिल्हा न्यायालयाचा तसा आदेश मिळाल्यानंतर अशा भाडेपट्ट्याचे किंवा पोटभाडेपट्ट्याचे, न्यायालय निदेश देईल अशा व्यक्तीला, अशा मोबदल्यात आणि अशा अटी व शर्तींवर, प्रत्यर्पण, अभिहस्तांकन करता येईल किंवा त्यांची अन्य प्रकारे विल्हेवाट लावता येईल.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या संबंधातील कोणत्याही बाबीसंबंधात आदेश काढण्याचे अधिकार.**

**६५.** जिल्हा न्यायालयाला, मनोरुग्ण व्यक्ती किंवा तिची मालमत्ता याच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून, या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीनतेने, त्या बाबीच्या संबंधात, परिस्थितीनुसार, त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील.

**वस्तुसूची किंवा लेखा यांच्या अचूकतेसंबंधात आक्षेप घेतल्यास त्यांसबंधातील कार्यवाही.**

**६६.** जर मनोरुग्ण व्यक्तीच्या कोणत्याही नातलगाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने, जिल्हा न्यायालयाकडे याचिका करून पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही वस्तुसूचीच्या किंवा विवरणपत्राच्या किंवा यथास्थिति, कलम ६० च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही वार्षिक लेख्याच्या अचूकतेसंबंधात आक्षेप घेतल्यास, न्यायालयाला, व्यवस्थापकास समन्स पाठवून या बाबींची संक्षिप्त चौकशी करता येईल आणि त्यावर योग्य वाटेल असा आदेश देता येईलः

परंतु असे की, जिल्हा न्यायालयाला, आपल्या स्वेच्छाधिकारात, अशी याचिका त्याला दुय्यम असणाऱ्या न्यायालयाकडे किंवा व्यवस्थापकाची नियुक्ती जिल्हाधिकाऱ्याने केली असेल आणि याचिका त्याने सादर केली नसेल अशा कोणत्याही प्रकरणात जिल्हाधिकाऱ्याकडे, विचारार्थ पाठवता येईल.

**संपदेमधून मिळालेल्या उत्पन्नाचा सरकारी खजिन्यामध्ये भरणा आणि गुंतवणूक.**

**६७.** मनोरुग्ण व्यक्तीच्या चालू खर्चासाठी किंवा त्याच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी, एखाद्या व्यवस्थापकाला कोणत्याही संपदेमधून आवश्यकतेपेक्षा अधिक मिळालेल्या सर्व रकमा, एक संपदा म्हणून, सरकारी खजिन्यामध्ये भरण्यात येतील आणि त्याची नियुक्ती करणाऱ्या प्राधिकाऱ्याने, लेखी नोंदवावयाच्या कारणांस्तव, मनोरुग्ण व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीने अशा रकमांची अन्यथा गुंतवणूक किंवा विनियोग करण्याचा निदेश दिलेला नसल्यास, भारतीय न्यास अधिनियम, १८८२ च्या कलम २० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रतिभूतीमध्ये वेळोवेळी गुंतविण्यात येतील.

**हिशेब घेण्यासाठी नातेवाईकाला दावा दाखल करता येणे.**

**६८.** मनोरुग्ण व्यक्तीच्या कोणत्याही नातेवाईकाला, या अधिनियमाअन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यवस्थापकाकडून किंवा विश्वस्तपदावरून दूर करण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीकडून किंवा मनोरुग्ण व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीकडून, त्यावेळी किंवा त्यापूर्वी त्याच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या किंवा अशा मालमत्तेमधून प्राप्त झालेल्या रकमांच्या किंवा अन्य मालमत्तेच्या संबंधातील हिशेब घेण्यासाठी, जिल्हा न्यायालयाच्या परवानगीने दावा दाखल करता येईल.

**६९.** (१) मनोरुग्ण व्यक्तीच्या मालमत्तेच्या व्यवस्थापकाला, नियुक्त करणाऱ्या प्राधिकाऱ्यास, पुरेशा व लेखी नमूद करावयाच्या कारणांस्तव काढून टाकता येईल, आणि अशा प्राधिकाऱ्यास, त्याच्या जागी नवीन व्यवस्थापक नियुक्त करता येईल.

**व्यवस्थापक आणि पालक यांना काढून टाकणे.**

(२) पोटकलम (१) अन्वये दूर करण्यात आलेला कोणताही व्यवस्थापक, मनोरुग्ण व्यक्तीच्या सर्व मालमत्तेचा ताबा आणि त्याने मिळवलेल्या किंवा संवितरित केलेल्या सर्व रकमांचा हिशेब, नवीन व्यवस्थापकाकडे देण्यास बांधील असेल.

(३) जिल्हा न्यायालयाला, पुरेशा कारणास्तव मनोरुग्ण व्यक्तीच्या कोणत्याही पालकास काढून टाकून, त्याच्या जागी नव्या पालकाची नियुक्ती करता येईल.

**७०.** (१) भागीदारी संस्थेची एखादी सदस्य व्यक्ती ही मनोरुग्ण असल्याचे आढळून आले तर, जिल्हा न्यायालयाला, भागीदारी विसर्जित करण्यासाठी अन्य कोणत्याही भागीदाराने केलेल्या अर्जावरून किंवा जी व्यक्ती अशा विसर्जनाची मागणी करण्यास हक्कदार आहे असे न्यायालयास आढळून येईल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून, भागीदारीचे विसर्जन करता येईल.

**एखादा सदस्य मनोरुग्ण झाल्यावरून भागीदारी संस्था विसर्जित करणे आणि तिच्या मालमत्तेची विल्हेवाट लावणे.**

(२) पोटकलम (१) जिला लागू होते अशा कोणत्याही भागीदारी संस्थेचे, उक्त पोटकलमावरून किंवा अन्यप्रकारे कायद्याच्या रीतसर कार्यवाहीनुसार, विसर्जन करण्यात आल्यावर, या अधिनियमाअन्वये नियुक्त करण्यात आलेल्या व्यवस्थापकाला, मनोरुग्ण व्यक्तीच्या नावाने आणि तिच्या वतीने, अन्य भागीदारांच्या बरोबर, न्यायालय निदेश देईल अशा अटीवरून, भागीदारी मालमत्तेची विल्हेवाट लावता येईल आणि भागीदारी विसर्जित करण्याच्या दृष्टीने न्यायालय निदेश देईल अशा सर्व कृती करता येतील.

**७१.** (१) पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा न्यायालयाला, संपदेसाठी व्यवस्थापकाची नियुक्ती करण्याऐवजी, रोख रकमेच्या बाबतीत रोख रक्कम आणि अन्य कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत तिच्यापासून मिळणारे उत्पन्न प्राप्त करून ते मनोरुग्ण व्यक्तीच्या आणि तिच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांच्या चरितार्थासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने, जिल्हा न्यायलयाने याबाबतीत नियुक्त केलेल्या व्यक्तीला प्रदान किंवा स्वाधीन करण्याबाबत आदेश देता येतील.

**विवक्षित प्रकरणात व्यवस्थापकाच्या नियुक्तीशिवाय मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाकरिता, मालमत्तेचा उपयोग करण्याचे अधिकार.**

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तीने दिलेल्या पावतीने, अशा प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्तीस मनोरुग्ण व्यक्तीचे पैसे देणारी किंवा तिची कोणतीही संपत्ती सुपूर्द करणारी व्यक्ती वैधरीत्या दायित्वमुक्त होईल.

**७२.** जर कोणतेही रोखे, सरकारी प्रतिभूती किंवा एखाद्या कंपनीतील कोणतेही शेअर (भारतात हस्तांतरणयोग्य असलेला किंवा त्याचा लाभांश भारतात प्रदेय असलेला) हे त्यास हक्कदार असलेल्या लाभार्थी मनोरुग्ण व्यक्तीच्या नावे असतील किंवा नेमून दिलेले असतील किंवा ते, तिच्याकडे किंवा या अधिनियमाअन्वये नियुक्त केलेल्या व्यवस्थापकाकडे किंवा त्याच्या कोणत्याही विश्वस्ताकडे निहित असतील आणि व्यवस्थापक मृत्युपत्र न करता मरण पावला किंवा तो स्वत: मनोरुग्ण झाला किंवा तो, जिल्हा न्यायालयाच्या अधिकारितेबाहेर असला किंवा तो व्यवस्थापक जीवित आहे वा मृत आहे हे अनिश्चित असले किंवा त्याने, त्याच्या जागी नियुक्त केलेल्या नव्या व्यवस्थापकास रोखे प्रतिभूती किंवा शेअर्स यांचे हस्तांतरण करण्यास किंवा लाभांश मिळवण्यास व त्यांचे प्रदान करण्यास, न्यायालयाने फर्माविल्यानंतर, १४ दिवसांच्या आत तसे करण्यास दुर्लक्ष केले असले किंवा तसे करण्यास नकार दिला असला तर, त्याबाबतीत, जिल्हा न्यायालय, निदेश देईल अशा रीतीने असे हस्तांतरण करून लाभांश मिळवण्याचा आणि त्याचे प्रदान करण्याचा निदेश त्या संबंधित कंपनीला किंवा शासनाला देईल.

**विवक्षित प्रकरणात, मनोरुग्ण व्यक्तीच्या मालकीचे रोखे, प्रतिभूती किंवा शेअर्स यांचे हस्तांतरण करण्याचा आदेश देण्याचा अधिकार.**

**७३.** कोणतेही रोखे, किंवा सरकारी प्रतिभूती किंवा कंपनीतील शेअर भारताबाहेर निवास करणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तीच्या नावे असतील किंवा तिच्याकडे निहित असतील तर, अशी व्यक्ती मनोरुग्ण असल्याचे घोषित करण्यात आले असेल आणि तिची वैयक्तिक संपदा, तो जेथे निवास करतो त्या ठिकाणच्या कायद्यानुसार, तिचे व्यवस्थापन करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे निहित करण्यात आली आहे याबाबत जिल्हा न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालयाला असे रोखे, प्रतिभूती, किंवा शेअर किंवा त्याचा कोणताही हिस्सा, अशा प्रकारे वा अन्य कोणत्याही प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे किंवा तिच्या नावे हस्तांतरित करण्याचा, आणि असे लाभांश व त्यापासून मिळणारे उत्पन्न प्राप्त करून ते न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रदान करण्याचा निदेश त्या कंपनीस किंवा संबंधित सरकारला, देता येईल.

**भारताबाहेर निवास करणाऱ्या मनोरुग्ण व्यक्तीचे रोखे, प्रतिभूती किंवा शेअर्स यांचा हस्तांतरणाचा आदेश देण्याचा अधिकार.**

**तात्पुरत्या मनोरुग्णतेच्या बाबतीत, मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्याकरिता संपत्तीचा उपयोग करण्याचे अधिकार.**

**७४.** मनोरुग्ण व्यक्तीचा मानसिक आजार हा तात्पुरत्या स्वरूपाचा असल्याचे आणि त्याचा चरितार्थ चालवण्यासाठी किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या त्याच्या कुटुंबीयांचा चरितार्थ चालविण्यासाठी तात्पुरत्या कालावधीकरिता तरतूद करणे आवश्यक असल्याचे जिल्हा न्यायालयाला आढळून आल्यास, न्यायालयाला, कलम ७१ अन्वये असेल अशा रीतीने, त्याची मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग यांचा, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाकरिता उपयोग करण्याचा निदेश देता येईल.

**मनोरुग्ण व्यक्तीचा मानसिक आजार बरा झाल्याचे जिल्हा न्यायालयाला आढळून आल्यास, त्या व्यक्तीसंबंधात केलेली कार्यवाही रद्द करणे.**

**७५.** (१) या प्रकरणाअन्वये कसून चौकशी केल्यानंतर मनोरुग्ण असल्याचे आढळून आलेल्या एखाद्या व्यक्तीचा मानसिक आजार बरा झाल्याचे जिल्हा न्यायालयास सकारण वाटत असेल तर, त्या न्यायालयाला, त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही न्यायालयास, अशा व्यक्तीचा मानसिक आजार बरा झाला आहे किंवा नाही याची कसून चौकशी करण्याचा निदेश देता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये करावयाची चौकशी ही, शक्य असेल तेथवर, या प्रकरणाअन्वये केल्या जाणाऱ्या कसून चौकशी प्रमाणेच करण्यात येईल.

(३) या कलमान्वये चौकशी करण्यात आल्यानंतर, एखाद्या व्यक्तीचा मानसिक आजार बरा झाल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतीत जिल्हा न्यायालयास लादणे योग्य वाटेल अशा अटी व शर्तींच्या अधीनतेने, त्या मनोरुग्ण व्यक्तीसंबंधात या अधिनियमान्वये करण्यात आलेली सर्व कार्यवाही रद्द करण्याचा आदेश देता येईल.

**अपिले.**

**७६.** जिल्हा न्यायालयाने या प्रकरणान्वये दिलेल्या प्रत्येक आदेशावर उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल.

**जिल्हा न्यायालयाचे विनियम करण्याचे अधिकार.**

**७७.** जिल्हा न्यायालयाला, या प्रकरणाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, वेळोवेळी विनियम करता येतील.

## प्रकरण सात

## मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये ठेवलेल्या मनोरुग्ण व्यक्तींच्या चरितार्थाचा खर्च भागविण्याबाबतचे दायित्व.

**विवक्षित प्रकरणांमध्ये चरितार्थाचा खर्च शासनाने सोसणे.**

**७८.** कोणत्याही मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात आंतररुग्ण म्हणून ठेवून घेतलेल्या मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाचा खर्च, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा तरतूद केलेली नसेल तर, मनोरुग्ण असणाऱ्या व्यक्तीच्या संबंधातील आदेश ज्याने काढला ते प्राधिकरण शासनाला दुय्यम असेल आणि,—

(क) ज्याने आदेश दिला त्या प्राधिकरणाने अशा मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाचा खर्च सोसण्याकरिता कोणत्याही व्यक्तीकडून वचनपत्र घेतलेले नसेल, आणि

(ख) या प्रकरणान्वये, जिल्हा न्यायालयाच्या आदेशामध्ये असा चरितार्थ चालवण्याचा खर्च सोसण्यासाठी कोणतीही तरतूद नसेल,

तर, तो खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल.

**मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेमधून किंवा तिचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेल्या व्यक्तीकडून चरितार्थाचा खर्च प्रदान करण्याकरिता जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करणे.**

**७९.** (१) मनोचिकित्सा रुग्णालयामध्ये किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयामध्ये ठेवलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीकडे कोणतीही संपदा असेल किंवा अशा व्यक्तीच्या चरितार्थ चालवण्याकरिता कायद्याने बांधील असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे अशा व्यक्तीचा चरितार्थ चालवण्याची साधने असतील तर, कलम ७८ अन्वये अशा व्यक्तीच्या चरितार्थाचा खर्च देण्याकरिता उत्तरदायी असलेल्या शासनाला किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अशा मनोरुग्ण व्यक्तीच्या चरितार्थाचा खर्च सोसण्याकरिता उत्तरदायी असलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, मनोरुग्ण व्यक्तीच्या संपदेचा वापर तिच्या चरितार्थाचा खर्च भागवण्यासाठी करण्याचा प्राधिकार देणारा आदेश देण्याकरिता किंवा, यथास्थिति, मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेल्या व अशा मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालविण्याची साधने ताब्यात असलेल्या व्यक्तीला निदेश देण्यासाठी मनोरुग्ण व्यक्तीची संपदा ज्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये येते किंवा मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्याकरिता कायद्याने बांधील असलेली आणि त्यासाठीची साधने ताब्यात असलेली व्यक्ती ज्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये राहते, त्या जिल्हा न्यायालयाकडे, अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये जिल्हा न्यायालयाने दिलेला आदेश हा, त्यामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेच्या किंवा व्यक्तीच्या संबंधातील दाव्यामध्ये अशा न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याप्रमाणेच अपील करण्याच्या अधीनतेने अंमलात येईल, आणि तो तसाच प्रभावी असेल.

**८०.** पूर्वगामी तरतुदींमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेल्या व्यक्तीला, अशा मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालविण्याच्या दायित्वातून मुक्त करते असे मानण्यात येणार नाही. **मनोरुग्ण व्यक्तीचा चरितार्थ चालवण्यासाठी कायद्याने बांधील असलेली व्यक्ती अशा दायित्वातून मुक्त नसणे.**

## प्रकरण आठ

## मनोरुग्ण व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण

**८१.** (१) कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीला उपचार चालू असताना कोणत्याही प्रकारे अपमानास्पद (मग ती शारीरिक असो किंवा मानसिक असो) किंवा क्रूरतेची वागणूक दिली जाणार नाही. **मानवी हक्कांवर अतिक्रमण न करता मनोरुग्णावर उपचार.**

(२) संशोधनाच्या प्रयोजनार्थ उपचार चालू असलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीचा,

(एक) जर असे संशोधन तिच्या रोगनिदानासाठी किंवा उपचारासाठी प्रत्यक्ष उपयुक्त नसेल ; किंवा

(दोन) जर त्या व्यक्तीने, स्वेच्छारुग्ण म्हणून अशा संशोधनासाठी तिची लेखी संमती दिलेली नसेल किंवा ती व्यक्ती (मग स्वेच्छारुग्ण असो किंवा नसो) अज्ञान असल्यामुळे किंवा अन्य कारणावरून विधिग्राह्य संमती देण्याकरिता अक्षम असेल त्याबाबतीत, तिच्या वतीने संमती देण्यासाठी सक्षम असलेल्या तिच्या पालकाने किंवा अन्य व्यक्तीने अशा संशोधनासाठी आपली लेखी संमती दिलेली नसेल तर, अशा कोणत्याही संशोधनासाठी वापर करता येणार नाही.

(३) मनस्तापजनक किंवा बदनामीकारक किंवा मनोरुग्णावरील उपचारांना बाधक ठरणाऱ्या पत्रव्यवहाराला प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनाकरिता कलम ९४ अन्वये याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, उपचार घेत असलेल्या मनोरुग्ण व्यक्तीने पाठविलेली किंवा तिला पाठवलेली पत्रे किंवा अन्य कोणत्याही संभाषणव्यवहारात हस्तक्षेप करता येणार नाही किंवा तो अडवून ठेवता येणार नाही किंवा नष्ट करता येणार नाही.

## प्रकरण नऊ

## शास्ती आणि कार्यपद्धती

**८२.** (१) जी कोणतीही व्यक्ती, प्रकरण तीनमधील तरतुदींचे उल्लंघन करून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करील किंवा ते चालवील ती व्यक्ती, दोष सिद्ध झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल, आणि दुसऱ्या किंवा त्या नंतरच्या अपराधाच्या बाबतीत, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल. **प्रकरण तीनचे उल्लंघन करून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्याबद्दल किंवा ते चालवल्याबद्दल शास्ती.**

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) अन्वये दोष सिद्ध झाल्यानंतर, प्रकरण तीन मधील तरतुदींचे उल्लंघन करून मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालय चालविण्याचे काम पुढे सुरू ठेवील ती व्यक्ती, दोषसिद्ध झाल्यानंतर, असे उल्लंघन चालू ठेवण्याच्या पहिल्या दिवसानंतरच्या प्रत्येक दिवसाकरिता शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**८३.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे, मनोचिकित्सा रुग्णालयात किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयात मनोरुग्ण व्यक्तीला दाखल करील, ठेवील किंवा तिचा तेथे सांभाळ करील ती व्यक्ती, दोषसिद्ध झाल्यानंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल. **मनोरुग्ण व्यक्तीला अयोग्य रीतीने दाखल केल्याबद्दल शास्ती.**

**८४.** मनोरुग्ण व्यक्तीच्या संपत्तीची व्यवस्था पाहण्याकरिता या अधिनियमाअन्वये नेमलेला जो कोणताही व्यवस्थापक, कलम ६० किंवा कलम ६९, पोटकलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तो, दोष सिद्ध झाल्यानंतर, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि जोपर्यंत तो उक्त तरतुदींचे अनुपालन करणार नाही तोपर्यंत त्याला दिवाणी कारागृहात ठेवता येईल. **कलम ६० आणि कलम ६९ चे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती.**

इतर अपराधांबद्दल दिल्या जाणाऱ्या शिक्षेकरिता सर्वसाधारण तरतुदी.

**८५.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे किंवा विनियमांचे उल्लंघन करील ती व्यक्ती, या अधिनियमामध्ये अशा उल्लंघनाकरिता कोणत्याही प्रकारच्या शास्तीची स्पष्टपणे तरतूद नसेल तर, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**८६.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल तर, असा अपराध घडण्याच्या वेळी जी त्या कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती तसेच, ती कंपनी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असेल :

परंतु असे की, असा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्व ती यथोचित दक्षता घेतली होती असे जर त्या व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीच्या संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे आणि त्यामध्ये व्यवसाय संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांचा समावेश होतो.

(ख) व्यवसाय संस्थेच्या संबंधात " संचालक " याचा अर्थ, त्या संस्थेचा भागीदार असा आहे.

खटल्यांना मंजुरी.

**८७.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, लायसन प्राधिकरणाची **१९७४ चा २.**
पूर्वमंजुरी घेतली असेल त्याखेरीज कलम ८२ खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

## प्रकरण दहा

## संकीर्ण

बंधपत्रविषयक तरतूद.

**८८.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण तेहतीस मधील तरतुदी, शक्य तेथवर, या अधिनियमाखाली **१९७४ चा २.**
केलेल्या बंधपत्रांना लागू होतील.

वैद्यकीय अधिकाऱ्याचा अहवाल.

**८९.** मनोचिकित्सा रुग्णालय किंवा मनोचिकित्सा शुश्रूषालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी, तेथे ठेवलेल्या कोणत्याही मनोरुग्ण व्यक्तीला सोडल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, ज्याच्या आदेशावरून त्या व्यक्तीला अशा प्रकारे ठेवण्यात आले होते त्या प्राधिकाऱ्याला, मनोरुग्ण व्यक्तीच्या मानसिक व शारीरिक स्थितीबाबतचा अहवाल पाठवील.

मनोरुग्ण व्यक्तीला शासनाकडून देय असलेले निवृत्तिवेतन, इत्यादी.

**९०.** (१) जेव्हा कोणत्याही शासनाकडून कोणत्याही व्यक्तीला वेतन, निवृत्तिवेतन, उपदान किंवा कोणताही भत्ता यासंबंधात कोणतीही रक्कम देय असेल आणि ज्या व्यक्तीला ही रक्कम देय असेल ती व्यक्ती मनोरुग्ण असल्याचे दंडाधिकाऱ्याने या अधिनियमाखाली प्रमाणित केले असेल तर, ज्या अधिकाऱ्याच्या प्राधिकारान्वये ही रक्कम देय असेल त्या अधिकाऱ्याला, उक्त रकमेमधून, मनोरुग्ण व्यक्तीच्या देखभालीकरिता योग्य वाटेल ती रक्कम, ती व्यक्ती जिच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला देता येईल आणि कोणतीही रक्कम शिल्ल्क असल्यास ती रक्कम किंवा त्याला योग्य वाटेल असा तिचा भाग, मनोरुग्ण व्यक्तीच्या कुटुंबातील ज्या व्यक्ती त्यांच्या चरितार्थासाठी मनोरुग्ण व्यक्तीवर अवलंबून असलेल्यांना देता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निधीतून त्या पोटकलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे रक्कम प्रदान केल्यानंतर कोणतीही रक्कम शिल्लक राहिली तर, शासन, ती रक्कम स्वत:जवळ ठेवील आणि तिची पुढीलप्रमाणे विल्हेवाट करील :—

(क) ज्या जिल्हा न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये अशी मनोरुग्ण व्यक्ती राहत असेल किंवा तिला तेथे ठेवलेले असेल किंवा स्थानबद्ध केले असेल त्या न्यायालयाने ती व्यक्ती मनोरुग्ण राहिलेली नाही असे प्रमाणित केले तर, त्या व्यक्तीला संपूर्ण शिल्लक रक्कम परत करण्यात येईल ;

(ख) अशी मनोरुग्ण व्यक्ती रक्कम मिळण्यापूर्वी मरण पावल्यास ती संपूर्ण शिल्लक रक्कम, ती मिळण्यास कायद्याने हक्कदार असलेल्या तिच्या वारसांना देण्यात येईल ;

(ग) जर अशी मनोरुग्ण व्यक्ती तिच्या आजारपणातच मृत्यू पावली आणि तिच्या संपदेवर कायद्याने हक्कदार असलेला कोणीही वारस नसेल तर, ती संपूर्ण शिल्लक रक्कम, जिल्हा न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने, जिल्हा न्यायालय मान्यता देईल अशा धर्मादाय प्रयोजनांकरिता वापरण्यात येईल.

(३) या कलमानुसार दिलेल्या कोणत्याही रकमेबाबतच्या सर्व दायित्वातून केंद्र सरकारला किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला मुक्त करण्यात येईल.

**काही विवक्षित प्रकरणांमध्ये मनोरुग्ण व्यक्तींना राज्याच्या खर्चाने कायदेविषयक साहाय्य.**

**९१.** (१) जिल्हा न्यायालयापुढे किंवा दंडाधिकाऱ्यापुढे या अधिनियमाखाली चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये मनोरुग्ण व्यक्तीच्या वतीने बाजू मांडण्यासाठी एखादा विधिव्यवसायी नसेल आणि अशा विधिव्यवसायीची नियुक्ती करण्यासाठी त्या व्यक्तीजवळ पुरेसा पैसा नाही असे जिल्हा न्यायालयास किंवा दंडाधिकाऱ्यास दिसून आले तर, जिल्हा न्यायालय किंवा दंडाधिकारी त्या व्यक्तीची बाजू मांडण्यासाठी राज्याच्या खर्चाने विधिव्यवसायी नेमून देईल.

(२) ज्या मनोरुग्ण व्यक्तीजवळ तिची बाजू मांडण्यासाठी एखादा विधिव्यवसायी नियुक्त करण्यास पुरेसा पैसा असूनही जिल्हा न्यायालयापुढे किंवा दंडाधिकाऱ्यापुढे या अधिनियमाखाली चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये त्या व्यक्तीची बाजू मांडण्यासाठी कोणीही विधिव्यवसायी नसेल आणि प्रकरणाच्या संपूर्ण परिस्थितीचा विचार करता, जिल्हा न्यायालयास किंवा दंडाधिकाऱ्यास विधिव्यवसायीने त्या व्यक्तीची बाजू मांडणे आवश्यक आहे असे वाटत असेल तर, जिल्हा न्यायालयास किंवा दंडाधिकाऱ्यास त्या व्यक्तीची बाजू मांडण्यासाठी एखाद्या विधिव्यवसायीची नियुक्ती करता येईल आणि राज्याला त्याबाबतचा खर्च सोसण्याचा आणि अशा व्यक्तींच्या संपत्तीमधून त्या खर्चाची वसुली करण्याचा निदेश देता येईल.

(३) उच्च न्यायालयास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने खालील गोष्टींची तरतूद करण्याकरिता नियम करता येतील,—

(क) पोटकलम (१) आणि (२) च्या प्रयोजनाकरिता विधिव्यवसायी निवडण्याची पद्धत ;

(ख) अशा विधिव्यवसायींना द्यावयाच्या सुविधा ;

(ग) सर्वसाधारणपणे पोटकलम (१) आणि (२) च्या प्रयोजनांच्या अंमलबजावणीसाठी अशा विधिव्यवसायींना शासनाकडून देय असलेली फी.

१९६१ चा २५. **स्पष्टीकरण.—**या कलमान्वये " विधिव्यवसायी " या शब्दाचा अधिवक्ता अधिनियम, १९६१, कलम (२), खंड (एक) मध्ये त्याला जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

**९२.** (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा काढलेले आदेश यांनुसार शासनाने सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा काढलेले आदेश यांनुसार शासनाने सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीमुळे कोणतेही नुकसान झाले किंवा होण्याचा संभव असला तरी त्याकरिता शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**विशिष्ट कायद्यांच्या निर्देशांचा अन्वयार्थ लावणे, इत्यादी.**

**९३.** (१) कोणत्याही क्षेत्रात अंमलात नसलेल्या एखाद्या कायद्याबाबतचा या अधिनियमामधील कोणत्याही निर्देशाचा, त्या क्षेत्राच्या संबंधातील अन्वयार्थ त्या क्षेत्रामध्ये अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याच्या, निर्देशाप्रमाणे लावण्यात येईल.

(२) या अधिनियमामधील कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्देशाचा, ज्या क्षेत्रामध्ये त्या पदनामाचा अधिकारी किंवा प्राधिकारी नसेल, त्या क्षेत्राच्या संबधातील अन्वयार्थ केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्देशाप्रमाणे लावण्यात येईल.

**केंद्र सरकारचा आणि राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.**

**९४.** (१) केंद्र सरकारला अधिसूचनेद्वारे, कलम ३ अन्वये मानसिक स्वास्थ्य प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येतील अशा व्यक्तींची अर्हता आणि त्या कलमान्वये ज्या अटी व शर्तींना अधीन राहून, त्या व्यक्तींची नियुक्ती करण्यात येईल त्या अटी व शर्ती आणि त्या प्राधिकाऱ्याशी संबंधित इतर सर्व बाबी यांविषयी तरतूद करणारे नियम करता येतील.

(२) पोटकलम (१) मधील तरतुदींना अधीन राहून, राज्य शासनाला, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील :

परंतु असे की, पहिले नियम, अधिसूचनेद्वारे, केंद्र सरकारकडून करण्यात येतील.

(३) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, पोटकलम (२) अन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(क) ज्यांची मानसिक स्वास्थ्य प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल अशा व्यक्तींची अर्हता आणि ज्या अटी व शर्तींना अधीन राहून, कलम ४ अन्वये त्या व्यक्तींची नियुक्ती करण्यात येईल त्या अटी व शर्ती आणि त्या प्राधिकाऱ्याशी संबंधित इतर सर्व बाबी ;

(ख) कलम ५, पोटकलम (१), खंड (घ) अन्वये ज्या व्यक्तींकरिता स्वतंत्र मनोचिकित्सा रुग्णालये आणि मनोचिकित्सा शुश्रूषालये स्थापन करण्यात येतील आणि चालवण्यात येतील अशा व्यक्तींचा वर्ग किंवा प्रवर्ग ;

(ग) ज्या नमुन्यामध्ये,—

(एक) कलम ७ किंवा, यथास्थिति, कलम ९ अन्वये लायसन देण्यासाठी किंवा त्याचे नवीकरण करण्यासाठी व त्याबाबत देय असलेली फी यांसाठी अर्ज करण्यात येईल तो नमुना ;

(दोन) कलम ८ अन्वये मनोचिकित्सा रुग्णालय आणि मनोचिकित्सा शुश्रूषालय स्थापन करण्याकरिता व ते चालविण्याकरिता लायसन देण्यात येईल तो नमुना ;

(तीन) कलम २० खालील स्वीकृति-आदेशाकरिता अर्ज देण्यात येईल तो नमुना ;

(घ) कलम ८ किंवा, यथास्थिति, कलम ११ अन्वये, लायसन देण्यास नकार देणारा किंवा तो रद्द करणारा आदेश ज्या रीतीने कळवण्यात येईल ती रीत ;

(ङ) कलम ९, पोटकलम (२) अन्वये ज्या रीतीने लायसन प्राधिकाऱ्याला अहवाल देण्यात येईल ती रीत ;

(च) कलम ९, पोटकलम (५) च्या परंतुकामधे निर्दिष्ट केलेल्या किमान सुविधा, तसेच,—

(एक) मनोचिकित्सक - रुग्ण प्रमाण ;

(दोन) इतर वैद्यकीय किंवा निमवैद्यकीय कर्मचारीवर्ग ;

(तीन) आवश्यक असलेली जागा ;

(चार) उपचार सुविधा ; आणि

(पाच) साधनसामग्री ;

(छ) कलम १० अन्वये ज्या रीतीने आणि ज्या शर्तींना अधीन राहून, मनोचिकित्सा रुग्णालय आणि मनोचिकित्सा शुश्रूषालय चालविण्यात येईल ती रीत व त्या शर्ती ;

(ज) कलम १२ अन्वये लायसन देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या किंवा ते रद्द करणाऱ्या आदेशाविरुद्ध ज्या नमुन्यात व ज्या रीतीने आणि ज्या कालावधीत अपील करता येईल तो नमुना, ती रीत व तो कालावधी आणि त्यासंबधात देय असलेली फी ;

(झ) कलम १३, पोटकलम (१) अन्वये ज्या रीतीने अभिलेख ठेवण्यात येतील ती रीत ;

(ञ) मनोरुग्ण व्यक्तीवर बाह्यरुग्ण म्हणून उपचार करण्याकरिता कलम १४ अन्वये द्यावयाच्या सुविधा ;

(ट) कलम २०, पोटकलम (६) अन्वये स्वीकृति-आदेशासाठीचा अर्ज ज्या रीतीने स्वाक्षरित करण्यात येईल व त्याची पडताळणी करण्यात येईल ती रीत ;

(ठ) कलम ३७ अन्वये वीक्षक म्हणून नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या अर्हता आणि ज्या अटी व शर्तींना अधीन राहून त्यांची नियुक्ती करण्यात येईल त्या अटी व शर्ती आणि त्यांची कार्ये ;

(ड) कलम ८१ च्या पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेला मनस्तापजनक किंवा बदनामीकारक पत्रव्यवहार आणि इतर बाबींवर प्रतिबंध ;

(ढ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**९५.** (१) या अधिनियमाअन्वये, केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही. **केंद्र सरकार किंवा राज्य शासनाकडून करण्यात आलेले नियम विधानमंडळापुढे ठेवणे.**

(२) या अधिनियमान्वये, राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवला जाईल.

**९६.** या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये त्यांच्याशी विसंगत काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामकारक असतील आणि अशा विसंगतीच्या मर्यादेपर्यंत तो इतर कायदा परिणामक असणार नाही, असे मानण्यात येईल. **या अधिनियमाचा इतर कायद्यांवर होणारा परिणाम.**

**९७.** जर कोणत्याही राज्यात या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवत असेल तर, राज्य शासनाला, आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, त्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल : **अडचण दूर करण्याचा अधिकार.**

परंतु असे की, ज्या दिनांकापासून हा अधिनियम एखाद्या राज्यात अंमलात येईल त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या समाप्तीनंतर, या कलमान्वये त्या राज्याच्या संबंधात कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**१९१२ चा ४. १९७७ चा जम्मू-काश्मीर अधिनियम, २५.**

**९८.** (१) भारतीय वेडाबाबत अधिनियम, १९१२ आणि वेडाबाबत अधिनियम, १९७७ याद्वारे निरसित करण्यात येत आहेत. **निरसन आणि व्यावृत्ती.**

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त दोन अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही, जेथवर अशी गोष्ट किंवा कार्यवाही या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नाही तेथवर, या अधिनियमाच्या तदनुरूप तरतुदींच्या अधीन राहून केली असल्याचे मानण्यात येईल आणि जोपर्यंत ती या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीने किंवा कार्यवाहीने निष्प्रभावी केली जाणार नाही तोपर्यंत ती अंमलात असण्याचे चालू राहील.

## The Mental Health Act, 1987

## मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ambulatory treatment facility | चालती फिरती उपचार सुविधा | [ sec. 3 (*3*) expl. ] |
| communication | संभाषण व्यवहार | [ sec. 81 (*3*) ] |
| convalescent home | स्वास्थ्यलाभ गृह | [ sec. 2 (*q*) ] |
| daycare centre | दिनपरिचर्या केंद्र | [ sec. 3 (*3*) expl. ] |
| detain | अडवून ठेवणे | [ sec. 81 (*3*) ] |
| general hospital | सर्वोपचार रुग्णालय | [ sec. 3 (*3*) expl.] |
| half-way homes | स्वास्थ्य विश्रामगृहे | [ sec. 3 (*3*) ] |
| mental health authority | मानसिक स्वास्थ्य प्राधिकारी | [ sec. 94 (*3*) (*a*) ] |
| mentally ill person | मनोरुग्ण व्यक्ती | [ Long title ] |
| psychiatric hospital | मनोचिकित्सा रुग्णालय | [ sec. 2 (*a*) ] |
| psychiatric nursing home | मनोचिकित्सा शुश्रूषालय | [ sec. 2 (*a*) ] |
| psychiatrist | मनोचिकित्सक | [ sec. 8 (*c*) ] |
| valid discharge | वैधरीत्या दायित्वमुक्ती | [ sec. 71 (*2*) ] |
| visitor | वीक्षक अधिकारी | [ sec. 37 ] |
| voluntary patient | स्वेच्छारुग्ण | [ sec. 15 ] |

## मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७

## The Mental Health Act, 1987

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अडवून ठेवणे | detain | [ कलम ८१ (३) ] |
| चलती फिरती उपचार सुविधा | ambulatory treatment facility | [ कलम (३) स्पष्टीकरण ] |
| दिनपरिचर्या केंद्र | daycare centre | [ कलम (३) स्पष्टीकरण ] |
| मनोचिकित्सक | psychiatrist | [ कलम ८ (३) ] |
| मनोचिकित्सा रुग्णालय | psychiatric hospital | [ कलम २ (क) ] |
| मनोचिकित्सा शुश्रूषालय | psychiatric nursing home | [ कलम २ (क) ] |
| मनोरुग्ण व्यक्ती | mentally ill person | [ शिर्षक ] |
| मानसिक स्वास्थ्य प्राधिकारी | mental health authority | [ कलम ९४ (३) (क) ] |
| वीक्षक अधिकारी | visitor | [ कलम ३७ ] |
| वैधरीत्या दायित्वमुक्ती | valid discharge | [ कलम ७१(२) ] |
| सर्वोपचार रुग्णालय | general hospital | [ कलम ३(३) स्पष्टीकरण ] |
| संभाषण व्यवहार | communication | [ कलम ८१ (३) ] |
| स्वास्थ्यलाभ गृह | convalescent home | [ कलम २ (थ) ] |
| स्वास्थ्य विश्रामगृहे | half-way homes | [ कलम ३ (३) ] |
| स्वेच्छारुग्ण | voluntary patient | [ कलम १५ ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई